कृषीवल
रायगड, सोमवार, दि. १८ मे २०२६
किंमत ४ ₹

## कंटेनरमधून लाखोंचे ड्रेस लंपास

**उरण :** न्हावा शेवा बंदर परिसरात कंटेनरमधील माल चोरीची आणखी एक घटना समोर आली असून, बंगळुरूहून एक्स्पोर्टसाठी आणलेल्या कंटेनरमधून तब्बल १३ लाख ५६ हजार रुपयांचे १,१७० लेडीज ड्रेस चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे.शाही एक्स्पोर्ट प्रा. लि. कंपनीचा हा माल अमेरिकेला पाठविण्यात येणार होता. ओम लॉजिस्टिक सप्लाय चेनमार्फत कंटेनर न्हावा शेवाकडे रवाना करण्यात आला होता. मात्र, उरणमधील स्पिडी सीएफएस यार्डमध्ये तपासणीदरम्यान १९७ कार्टूनमधील ड्रेस गायब असल्याचे निदर्शनास आले. पान २ वर

## खते, बियाणे विक्रीवर करडी नजर




- शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या विक्रेत्यांवर होणार कठोर कारवाई
- कृषी विभागाकडून जिल्हास्तरावर तपासणी पथके सक्रिय

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

खरीप हंगाम तोंडावर आला असताना शेतकऱ्यांना वेळेत आणि पुरेशा प्रमाणात बियाणे, खते व कीटकनाशके उपलब्ध व्हावीत यासाठी रायगड जिल्हा परिषद कृषी विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. जिल्ह्यातील परवानाधारक विक्रेत्यांवर पथकांमार्फत लक्ष ठेवण्यात येत असून, शेतकऱ्यांची फसवणूक किंवा आर्थिक लूट करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

मे महिना संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक राहिले असून जिल्ह्यात लवकर पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे शेतकरी सध्या शेती मशागतीच्या कामात व्यस्त झाले आहेत. बांधबंदिस्ती, गवत काढणे, पालापाचोळा गोळा करणे, राब जाळणे आदी कामांना वेग आला आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी भात बियाणे आणि खतांची खरेदी सुरू केली आहे.

भात लागवडीसाठी शेतकऱ्यांना वेळेत बियाणे आणि खते उपलब्ध व्हावीत यासाठी प्रशासनाने जिल्ह्यातील परवानाधारक विक्रेत्यांकडे पुरवठा सुरू केला आहे. रायगड जिल्ह्यात सुमारे ९१ हजार ५२१ हेक्टर क्षेत्रावर भात लागवड केली जाते. यंदा कृषी विभागाने पान २ वर

## वेधक

### चाकूहल्ल्यात एकाचा खून

**उरण :** तालुक्यातील जांभुळपाडा येथील आदिवासी वाडीवर दोन व्यक्तींमध्ये झालेल्या वादाचे रूपांतर थेट खुनात झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. चाकूहल्ल्यात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला असून, पोलिसांनी आरोपीला तात्काळ अटक केल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास जांभुळपाडा येथील वाडीवर दोघांमध्ये जोरदार भांडण झाले. वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपीने चाकूने वार केल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच उरण पोलीस ठाणे येथील पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. या प्रकरणाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### २० मे रोजी भारत बंदची हाक

**उरण :** ऑनलाईन माध्यमातून खुलेआम विक्री होणारी शेड्युल औषधे, डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय तरुणांना सहज उपलब्ध होणारी नशेची औषधे आणि अँटिबायोटिक्सच्या अनियमित वापरामुळे निर्माण होत असलेल्या गंभीर आरोग्य धोक्याविरोधात आता औषध विक्रेते आक्रमक झाले आहेत. रुग्णांच्या हितासाठी आणि भविष्यातील पिढीचे आरोग्य वाचवण्यासाठी २० मे रोजी देशभरातील औषध विक्रेत्यांनी भारत बंदची हाक दिली आहे. ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड डिस्ट्रीब्युटर्सचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार हा बंद पुकारण्यात आला असून, रायगड जिल्ह्यातही त्याला पान २ वर

## गाळ काढला तर उमटे धरण फुटेल?

# 'पुडी' सोडणाऱ्यांना चपराक



- धरणातील गाळाच्या प्रश्नावर नागरिक त्रस्त
- दूषित पाण्यामुळे 60,000 नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर

**| चौल | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्याची तहान भागविणाऱ्या उमटे धरणातील गाळाच्या प्रश्नावर आता नागरिक आणि सामाजिक संघटना आक्रमक झाल्या आहेत. शुद्ध पाणीपुरवठा करण्यात रायगड जिल्हा परिषद अपयशी ठरल्याची टीका ग्रामीण भागातून होत असताना, "गाळ काढला तर धरण फुटेल" अशी भीती पसरवणाऱ्यांना उमटे धरण संघर्ष ग्रुप रायगडने जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

सध्या उमटे धरणातील पाण्याची पातळी झपाट्याने कमी होत असून, धरणाने तळ गाठण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे धरणातून शेवाळ, माती आणि गाळमिश्रित पाणीपुरवठा होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या धरणावर अवलंबून असलेल्या सुमारे ६० हजारांहून अधिक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, दूषित पाण्यामुळे उलटी, जुलाब, कावीळ आणि विषमज्वरासारख्या जलजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे.

अलिबाग तालुक्यातील रामराज विभागातील बोरघर ग्रामपंचायत हद्दीत १९७८-७९ या कालावधीत उमटे धरण उभारण्यात आले होते. तब्बल ४५ वर्षांहून अधिक जुन्या असलेल्या या धरणातून रामराज, सुडकोली, बोरघर, चिंचोटी, बेलोशी, खानाव, बामणगाव, वरंडे, आक्षी, नागाव, रेवदंडा आणि चौलसह ४५ गावांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून नळाद्वारे येणाऱ्या पाण्याला दुर्गंधी येत असून गाळमिश्रित पाणी नागरिकांच्या घरात पोहोचत आहे. त्यामुळे रायगड जिल्हा परिषद ६० हजारांहून अधिक नागरिकांच्या जिवाशी खेळत असल्याची तीव्र भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे. याप्रकरणी तातडीने उपाययोजना करून धरणातील गाळ काढण्याची मागणी आता अधिक तीव्र झाली आहे.

उमटे धरणातील गढूळ पाणी, साचलेला गाळ आणि नागरिकांना होणारा दूषित पाणीपुरवठा हा प्रश्न विधानसभेतही गाजला होता. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. उमटे धरण संघर्ष ग्रुप रायगडचे ॲड. राकेश पाटील यांनी, मागील दहा वर्षांपासून गाळ काढण्याच्या मागणीवर प्रशासन आणि काही राजकीय नेते जनतेमध्ये दिशाभूल करणारी 'पुडी' सोडत होते, असा आरोप केला आहे. "गाळ काढला तर पाण्याच्या दाबामुळे धरण फुटेल," अशी भीती मुद्दाम पसरवण्यात आली. मात्र, दोन दिवसांपूर्वी रायगड जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता मोहन सरोदे यांनी उमटे धरणाला भेट दिल्यानंतर या अफवांना पूर्णविराम मिळाल्याचा दावा संघर्ष समितीच्या ॲड. राकेश पाटील यांनी केला आहे. धरण फुटण्याचा कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट झाल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात रोष अधिक तीव्र झाला आहे.

यापूर्वी शेकाप नेत्या चित्रलेखा पाटील आणि माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या पान २ वर

### आठ कोटींची निविदा, पण ठेकेदारच मिळेना!

उमटे धरणाच्या बाबतीत शासनाची भूमिका दिशाभूल करणारी असल्याचा आरोप करत ॲड. राकेश पाटील यांनी सांगितले की, धरणातील तुटलेली जॅकवेल आणि गाळ काढण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, माणगाव विभागाने १५ एप्रिल २०२५ रोजी तब्बल ८ कोटी ८१ लाख ३५ हजार ६३१ रुपयांची निविदा काढली होती. मात्र, या कामासाठी सरकारला ठेकेदारच मिळाला नसल्याने उमटे धरण आजही गाळातच रुतलेले आहे.

### गंमत नको, हिंमत दाखवा!

दरम्यान, उन्हाची तीव्रता वाढत असताना उमटे धरणातील गाळाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नुकत्याच झालेल्या रायगड जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये विजयी उमेदवारांच्या हातातील "मोठं मोठं गार केले गंमत म्हणून, आता उमटे धरणाचा गाळही काढा समाजाचं हित म्हणून" या फलकांची समाजमाध्यमांवर खिल्ली उडवली जात आहे. आतापर्यंत झाली तेवढी गंमत पुरे झाली, आता गाळ काढण्यासाठी हिंमत दाखवा, असा टोला राकेश पाटील यांनी विजयाचे बॅनर दाखवणाऱ्या जि.प. सदस्यांना लगावला आहे.

### शेकापकडून सर्वात आधी गाळउपसा

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या चित्रलेखा पाटील यांनी परिसरातील तीव्र पाणीटंचाई आणि अशुद्ध पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी उमटे धरणातील गाळ काढण्याची आक्रमक भूमिका घेतली होती. प्रशासकीय दिरंगाईमुळे त्यांनी स्वखर्चाने किंवा संस्थेच्या माध्यमातून गाळ काढण्याची परवानगी मागितली होती. त्यानंतर प्रशासनाने सीएफटीआय संस्थेला धरणातील गाळ काढण्याची परवानगी दिली होती. त्यानंतर चित्रलेखा पाटील आणि अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्या पुढाकारातून धरणातील गाळमुक्तीला गती मिळाली होती. धरणातील गाळ काढण्याचे प्रत्यक्ष कामही हाती घेण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही कायमस्वरुपी उपाययोजना न झाल्याने धरणाच्या गाळाचा प्रश्न पुन्हा गंभीर बनला आहे.

> **उमटे धरणाच्या गाळाचा प्रश्न सोडवण्यात रायगड जिल्हा परिषद आणि जिल्हा महसूल विभाग पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. नागरिकांना आठ दिवसाआड पिण्याचे पाणी मिळत असेल, तर ही सरकारने लादलेली आधुनिक गुलामीच आहे. प्रशासनाने आम्हाला मुंबई उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्याची वेळ आणू नये.**
> **– ॲड. राकेश पाटील, उमटे धरण संघर्ष समिती**

## टोरंट प्रकल्पाविरोधात आज पर्यावरणप्रेमींचा एल्गार




**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल-खलाटी परिसरात प्रस्तावित टोरंट पॉवरच्या जलविद्युत प्रकल्पाविरोधात पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिक आक्रमक झाले आहेत. या प्रकल्पामुळे तब्बल ९०० एकर परिसरातील जैवविविधता, वनसंपत्ती आणि जीवसृष्टी धोक्यात येणार असल्याचा आरोप करत उद्या सोमवारी (दि. १८) एकदिवसीय धरणे आंदोलन छेडण्यात येणार आहे.

पर्यावरण कार्यकर्त्यांच्या मते, या प्रकल्पासाठी वन विभागाच्या सुमारे ६४० एकर जमिनीवर परिणाम होणार असून, हजारो औषधी वनस्पती आणि वन्यजीवांचे अधिवास नष्ट होण्याचा धोका आहे. प्रकल्प उभारणीदरम्यान अंदाजे अडीच लाख झाडांची तोड होणार असल्याचा दावा करण्यात येत असून, त्यामुळे कर्जत तालुक्याच्या पर्यावरणीय संतुलनावर गंभीर परिणाम होऊ शकतो. या प्रकल्पामुळे कर्जत आणि ठाणे जिल्ह्याची जीवनवाहिनी मानली जाणारी पेज नदी प्रदूषित होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नदीच्या प्रवाहावर परिणाम झाल्यास भविष्यात पिण्याच्या पान २ वर

## मिनी माथेरानच्या नावाखाली जमिनी लाटण्याचा डाव?



- वन नियमांचे उल्लंघन; स्थानिकांचा आरोप

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान इको सेन्सेटिव्ह झोनमधील गार्बेट परिसरात पर्यटन विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात काँक्रिटीकरण आणि वन नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. 'मिनी माथेरान' उभारण्याच्या नावाखाली संरक्षित वन क्षेत्रातील जमिनींवर डोळा ठेवला जात असून, भविष्यात आदिवासी आणि स्थानिकांच्या जमिनी बळकावण्याचा प्रयत्न होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे.

माथेरानच्या डोंगररांगांमध्ये वसलेली गार्बेट वाडी ही धनगर समाजाची छोटी वस्ती आहे. या भागाभोवती मोठ्या प्रमाणात वन विभागाची जमीन असून संपूर्ण परिसर संरक्षित वन आणि इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये मोडतो. २००१ पासून या भागात स्फोटक वापर, खोदकाम, नवीन सिमेंट बांधकामे यांवर निर्बंध आहेत. मात्र, असे असतानाही गार्बेट वाडीकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी झाडांची तोड, खोदकाम आणि काँक्रिटीकरण करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, अवघ्या तीन कुटुंबांसाठी तब्बल सात कोटी रुपयांचा रस्ता तयार केला जात असून, यासाठी आदिवासी विकास विभागाचा पान २ वर

### आदिवासी निधीवर प्रश्नचिन्ह

गार्बेट वाडीतील रस्त्यासाठी आदिवासी विकास विभागाचा निधी वापरला जात असल्याने वाद निर्माण झाला आहे. स्थानिकांच्या मते, धनगर समाज ओबीसी प्रवर्गात येत असताना आदिवासी भागाच्या विकासासाठी असलेला निधी दुसरीकडे वळविण्यात आला आहे. त्यामुळे खऱ्या आदिवासी भागांच्या विकासावर परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

## पेण-पनवेल लोकलची प्रतीक्षा संपणार कधी?




### 'तिसरी मुंबई'च्या स्वप्नांना रेल्वे जोडणीची गरज

**| पेण | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्याला 'तिसरी मुंबई' म्हणून विकसित करण्याच्या घोषणा सातत्याने होत असल्या, तरी त्या विकासाचा कणा मानली जाणारी पेण-पनवेल लोकल सेवा अद्यापही प्रत्यक्षात आलेली नाही. वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि रोजगारासाठी दररोज होणारी प्रवाशांची धावपळ पाहता ही लोकल सेवा आता अत्यावश्यक गरज बनली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी विस्तार, मुंबई-गोवा महामार्गाचे रुंदीकरण, रसायनी-नागोठणे औद्योगिक पट्ट्याचा विकास तसेच अलिबाग-रायगड पर्यटन क्षेत्रातील वाढ यामुळे रायगड जिल्ह्याचा वेगाने विकास होत आहे. पान २ वर




**आगोटीसाठी खरेदीची लगबग** | **भाव स्थिर असल्याने ग्राहकांना दिलासा**

## रायगडात सुक्या म्हावऱ्याची चलती

धम्मशील सावंत
**| पाली/बेणसे |**



पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. १ जूनपासून दोन महिने पावसाळ्यात मासेमारी बंद असते. पावसाळ्यातील बेगमीसाठी सुकी मासळी हक्काची जिन्नस आहे. आणि मग यावेळी मांसाहारी खाणाऱ्यांना सुक्या मासळीचा उत्तम पर्याय असतो. त्यामुळेच या दिवसांत सुकी मासळी खरेदी व साठवण करण्याची अनेक जणांची लगबग सुरु आहे. शिवाय, भावदेखील स्थिर आहेत. परिणामी, खवय्ये सुकी मासळी खरेदीची घाई करत आहेत.

मागील वर्षी मे महिन्यात सुरू झालेला अवकाळी पाऊस आणि त्याचबरोबर लांबलेला पाऊस यामुळे सुक्या मासळीची कमतरता होती. शिवाय, भावदेखील प्रचंड वधारले होते. मात्र, यंदा सुक्या मासळीचे भाव स्थिर आहेत. सध्या आगोटीची लगबग सुरु असून, जिल्ह्यातील आठवडा बाजार व मासळी बाजारात सुकी मासळी खरेदीसाठी रेलचेल सुरु आहे.

> मागील हंगामाच्या तुलनेत आता सुक्या मासळीचे भाव कमी व स्थिर झाले आहेत. पावसाळ्यातील बेगमीसाठी खवय्ये आवर्जून सुकी मासळी खरेदी करतात. पुणे, मुंबईकडे जाणारे प्रवासी व पर्यटक तसेच स्थानिक नागरिक ही खरेदी करतात. किमती स्थिर असल्यामुळे अधिक खरेदी करत आहेत. ग्राहकांना उत्तम दर्जाची सुकी मासळी योग्य दरात पुरवतो.
> – सुनील सावंत, सुकी मासळी विक्रेता, पेडली

> पावसाळ्यात खाण्यासाठी सुकी मासळी साठवून ठेवते. त्यामुळे दरवर्षी या दिवसांत सुकी मासळी खरेदी करते. जेवणात मासे, मटण नसले तर सुकी मासळी आवर्जुन लागते. त्यामुळे सुकी मासळी खरेदी केली आहे. जिल्ह्यात चांगल्या दर्जाची सुखी मासळी मिळते.
> – तृप्ती घोलप, शिक्षिका, तळोजा

पावसाळ्याच्या चार महिन्यांत भाजीपाला व मासळी यांची आवक कमी होते. पान २ वर

# रायगड किनाऱ्यावर रो-रो प्रकल्पांचा बोजवारा

## कोट्यवधी खर्चूनही सेवा ठप्प;अपूर्ण जेट्टी, तांत्रिक बिघाड आणि वाढलेला खर्च



**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

कोकण किनारपट्टीवरील रो-रो बोट सेवा प्रकल्पांबाबत गंभीर अनियमितता आणि नियोजनशून्य कारभार समोर येत आहे. राज्य आणि केंद्र सरकारांनी मोठ्या गाजावाजात जाहीर केलेल्या मुंबई-सिंधुदुर्ग, मुंबई-मांडवा, मुंबई-रेवदंडा, मुंबई-काशिद आणि रेवस-करंजा मार्गांवरील अनेक प्रकल्प आजही अपूर्ण अवस्थेत आहेत. कोट्यवधी रुपयांचा खर्च वाढूनही सेवा सुरळीत सुरू न झाल्याने स्थानिक नागरिक, व्यापारी आणि पर्यटन व्यावसायिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

मुंबई-सिंधुदुर्ग मार्गावरील बहुप्रतीक्षित रो-रो सेवा सुरू झाल्यानंतर अवघ्या ३५ दिवसांतच बंद पडली. विजयदुर्ग बंदरातील जेट्टीचे रखडलेले काम आणि समुद्रातील कचऱ्यामुळे इंजिनात निर्माण झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे सेवा ठप्प झाल्याची माहिती समोर आली आहे.

मेरीटाईम बोर्डातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, प्रकल्पांच्या सुरुवातीच्या अंदाजपत्रकापेक्षा खर्च अनेक पटींनी वाढला आहे. हा वाढीव खर्च वसूल करण्यासाठी तिकीटदर वाढवण्यात येत असून, त्यामुळे ही सेवा सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे.

तपासात असेही स्पष्ट झाले आहे की, टेंडर प्रक्रियेनंतर सब-कॉन्ट्रॅक्टिंग, डिझाईन बदल आणि अतिरिक्त कामांच्या नावाखाली खर्च वाढवण्यात आला. परिणामी, अनेक प्रकल्पांची मुदत लांबत गेली, मात्र जबाबदारी निश्चित न झाल्याने कामे अर्धवटच राहिली आहेत. स्थानिक युवकांना रोजगार देण्याचे आश्वासनही पूर्ण न झाल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी सांगितले की, ''रो-रो सेवा ही विकासासाठी महत्त्वाची योजना असू शकते; मात्र पारदर्शकता आणि जबाबदारी नसल्यास हे प्रकल्प भ्रष्टाचाराचे माध्यम ठरू शकतात.''

स्थानिक व्यापारी आणि पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिकांनीही या प्रकल्पांच्या अकार्यक्षमतेमुळे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे प्रकल्पांची स्वतंत्र चौकशी, खर्चवाढीची सार्वजनिक पडताळणी आणि स्थानिकांना रोजगार देण्याची सक्ती करण्याची मागणी जोर धरत आहे.



# कोथुर्डे धरणाने तळ गाठला

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड शहरासह ग्रामीण भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या कोथुर्डे धरणाची रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले यांनी प्रत्यक्ष पाहणी करून धरणातील पाणीसाठ्याची स्थिती जाणून घेतली. सध्या धरणातील पाण्याची पातळी पूर्णपणे खालावलेली असल्याचे पाहणीदरम्यान निदर्शनास आले.

आगामी काळात पाऊस उशिरा झाल्यास महाड शहर तसेच ग्रामीण भागात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, याबाबत तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना मंत्री गोगावले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी पर्यायी पाणीपुरवठा योजना, उपलब्ध जलस्रोतांचा वापर, तसेच नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये यासाठी आवश्यक नियोजनाबाबत अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच कोथुर्डे धरणामध्ये साचलेला गाळ तातडीने काढण्यात यावा, असे आदेश यावेळी देण्यात आले आहेत.

# महसूल न्यायालयाचे कामकाज मराठीतून

## नवी एसओपी लागू; प्रकरणांचा झटपट निपटारा होणार

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यभरातील महसूल अधिकारी आणि प्राधिकरणांकडे दाखल होणारी अर्धन्यायिक प्रकरणे अधिक वेगाने आणि पारदर्शक पद्धतीने मार्गी लागण्यासाठी नवीन मानक कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करण्यात आली असून, त्याची अंमलबजावणी आजपासूनच करण्यात येईल. नवीन नियमानुसार, महसूल विभागातील सर्व अर्धन्यायिक कामकाजात मराठी भाषेचा वापर करणे आणि निकालपत्रे मराठीतूनच देणे आता बंधनकारक करण्यात आले आहे.

महसूल न्यायालयांमधील कामकाजात पीठासीन अधिकाऱ्यांकडून अनेकदा गंभीर त्रुटी घडत असल्याचे निदर्शनास आले होते. यामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक न्यायतत्त्वांचे पालन न करणे, वस्तुस्थिती व कायदेशीर तरतुदींचा विचार न करता निर्णय देणे, अधिकारक्षेत्र नसतानाही आदेश पारित करणे, आणि पुरेशा कारणाशिवाय विलंबाचे अर्ज मंजूर करणे अशा बाबींचा समावेश होता. या पार्श्वभूमीवर महसूल मंत्री बावनकुळे यांनी ही व्यवस्था सुधारण्यासाठी पाऊल उचलले आहे. शासन निर्णयात गौणखनिज प्रकरणे, शेतरस्ता उपलब्ध करून देणे, दरखास्त प्रकरणे, कलम १५५ अंतर्गत लेखनप्रमाद दुरुस्ती आणि महसूल संहितेतील विविध प्रकरणांच्या सुनावणीसाठी स्वतंत्र व स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत.

### असे असतील नवे नियम

सर्व महसूल अधिकाऱ्यांना आठवड्यातून किमान दोन वेळा (शक्यतो मंगळवार आणि शुक्रवार) सुनावणी घेणे बंधनकारक. कोणत्याही सुनावणीत केवळ ठोस कारण असल्यास एकदाच तहकुबी दिली जाईल. सर्व प्रकारचे अंतरिम आणि अंतिम निर्णय ऑनलाइन प्रणालीवर नोंदवून ते डिजिटल स्वाक्षरीनेच देणे अनिवार्य. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय आणि निकालात योग्य कारणमीमांसा दिल्याशिवाय कोणताही आदेश देता येणार नाही.

# शिवसैनिकांचा खालापुरात मेळावा

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे निष्ठावंत शिवसैनिक म्हणून ५ जून रोजी खालापूर तालुक्यात शिवसैनिकांचा भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, या मेळाव्यात वयाची ६० वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ निष्ठावंत शिवसैनिकांचा सत्कार करण्यात येणार असल्याचे तालुकाप्रमुख एकनाथ पिंगळे यांनी बोलताना सांगितले. हा निष्ठावंत शिवसैनिकांचा मेळावा यशस्वी करण्यासाठी तालुक्यातील शिवसैनिक तयारीला लागले असून, खालापूर तालुक्यातील शाखाप्रमुखांनी आजी, माजी पदाधिकारी यांची यादी तयार करायला सुरुवात झाली आहे.

# पोलादपूरमध्ये हजारो फळझाडांचे वाटप



● (छायाचित्र : शैलेश पालकर)

■ अर्जुन पार्टे यांना आगळीवेगळी श्रद्धांजली

■ आपली माती आपलं माणसं संघटनेचा उपक्रम

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील आपली माती आपलं माणसं संघटनेच्यावतीने २५०० फळझाडांचे वाटप करण्यात आले. खोपड गावचे आपली माती आपली माणसं संघटनेचे ग्रामीण भागातील सक्रीय कार्यकर्ते अर्जुन पार्टे यांचे आकस्मिक निधन झाल्याने त्यांना उत्तरकार्याच्या दिवशी फळझाडांच्या वाटपाचा उपक्रम राबवून त्यांना आगळीवेगळी श्रद्धांजली वाहण्यात आली

''आपली माती आपली माणसं'' संघटनेतर्फे विविध समाजोपयोगी उपक्रम दरवर्षी राबविण्यात येत असतात. यंदा २५०० फळझाडांच्या वाटपाचा उपक्रम राबविण्याचे नियोजन पूर्ण झाले असतानाच खोपड गावातील संघटनेचे सक्रीय कार्यकर्ते अर्जून पार्टे यांचे अकस्मात निधन झाले.

त्यांच्या सामाजिक कार्याची आठवण समाजासमोर निरंतर राहावी तसेच पर्यावरण रक्षणाचा उद्देश साध्य होण्यासाठी यावेळीचा फळझाडांच्या वाटपाचा उपक्रम आपली माती आपली माणसं संघटनेतर्फे त्यांच्या उत्तरकार्याच्या दिवशी रविवार दि. १७ मे रोजी संस्थापक राज पार्टे, अध्यक्ष निलेश कोळसकर, हरी पवार, संजय कळंबे, गणेश मालुसरे तसेच खेडेकर आणि सर्व पदाधिकारी व सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत राबविण्यात आला.

पोलादपूर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल होत असून ओझोनचे प्रमाण घटल्याने अतिनील किरणे वातावरणाचे संतुलन बिघडवित ऑक्सिजनची कमतरता निर्माण करीत असल्याने प्रत्येकाने वृक्षारोपण करणे गरजेचे असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. अर्जुन पार्टे यांच्या स्मरणार्थ लावलेली फळझाडे त्यांच्या कार्याचे स्मरण मनात निरंतर ठेवतील, अशी भावना संघटनेचे अध्यक्ष नितेश कोळंबकर यांनी व्यक्त केली. तालुक्यातील विविध गावे व वाड्यांतील नागरिकांनी फळझाडांची रोपे स्वीकारून आमची माती आमची माणसं सामाजिक संघटनेच्या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीकडे वळावे

## आमदार रवींद्र पाटील यांचे आवाहन



**। पाली । प्रतिनिधी ।**

शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीवर अधिकाधिक भर देत आधुनिक तंत्रज्ञान आणि नवनवीन उपक्रमांचा अवलंब करून प्रगतशील बनावे, असे आवाहन आ. रवींद्र पाटील यांनी केले. सुधागड-पाली येथे आयोजित तालुकास्तरीय कृषी मेळावा आणि मार्गदर्शन कार्यक्रमात ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते.

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सुधागड-पाली यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समितीच्या आवारात शुक्रवारी (दि.१५) कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हा परिषदेचे कृषी, पशुसंवर्धन व दुग्धविकास समिती सभापती वैकुंठ पाटील यांच्या पुढाकारातून प्रत्येक तालुक्यात कृषी मेळावे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यानुसार हा मेळावा पार पडला.

यावेळी बोलताना आ. पाटील यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पदाधिकारी व अधिकाऱ्यांनी विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचना दिल्या. जिल्हा परिषद सेस फंड योजनेंतर्गत लाभ मंजूर झालेल्या शेतकऱ्यांना सुधारित कृषी औजारांचे वाटप करण्यात आले. तसेच राबगाव येथील भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना भाजीपाला कॅरेटचे वितरण करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

मेळाव्यात कृषी विभागाच्या योजनांची माहिती, प्रगतशील शेती, सेंद्रिय शेती तसेच शेतीपूरक व्यवसायांबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. कृषी शास्त्रज्ञ सचिन कार्ले यांनी प्रगतशील शेतीविषयी सखोल मार्गदर्शन केले, तर संस्थेचे प्रसाद दगडे यांनी सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून दिले.

उपसभापती संदेश शेवाळे यांनी शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेऊन आर्थिक प्रगती साधावी, असे आवाहन केले. सभापती जागृती मानकर यांनी शेतकऱ्यांनी दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि मत्स्य व्यवसाय यांसारखे शेतीपूरक उद्योग स्वीकारून आर्थिक स्तर उंचवावा, असे सांगितले.

वैकुंठ पाटील यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी जिल्हा परिषद सेस फंड योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन करत भविष्यात या निधीत मोठी वाढ करण्याचे आश्वासन दिले.

# द्रोणागिरीत चोरट्यांचा धुमाकूळ

■ बंद घर फोडून पाच लाखांचा ऐवज लंपास

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील द्रोणागिरी नोडमध्ये बंद घरांना लक्ष्य करणाऱ्या चोरट्यांनी पुन्हा एकदा धुमाकूळ घालत एका फ्लॅटचा कडी-कोयंडा तोडून तब्बल ५ लाख ५ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे द्रोणागिरी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

द्रोणागिरी येथील सेक्टर ५० मधील हरीसखा अपार्टमेंटच्या घर क्रमांक ८०३ मध्ये सुनंदा धर्मराज कडू (५५) या पती धर्मराज कडू यांच्यासह राहतात. बुधवार, १३ मे रोजी दोघेही घराला कुलूप लावून कामानिमित्त बाहेर गेले होते. सायंकाळी घरी परतल्यानंतर त्यांना घराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा तुटलेला आणि दरवाजा अर्धवट उघडा दिसला.

घरात प्रवेश करून पाहिले असता बेडरूममधील कपाट उघडे असून संपूर्ण सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरीला गेल्याचे निदर्शनास आले, तर नकली दागिने जमिनीवर फेकलेले होते. या चोरीमध्ये ३ तोळ्यांचा सोन्याचा कंठीहार, ५ तोळ्यांचे सोन्याचे गंठण, सोन्याची अंगठी, सोन्याच्या कुड्या, चांदीचे पैंजण, जोडवे आणि ५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ५ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.

घटनेची माहिती मिळताच उरण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. सुनंदा कडू यांच्या तक्रारीवरून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून ठाणे प्रभारी अधिकारी हनिफ दस्तगीर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सतीश गोरे पुढील तपास करत आहेत.

पान १ वरून

## कंटेनरमधून लाखोंचे ड्रेस लंपास

चौकशीत कंटेनर चालक केंम्पाहीय्या जी. हा कंटेनर यार्डमध्ये टाकून फरार झाल्याचे समोर आले. जीपीएस तपासणीत कंटेनर द्रोणागिरी परिसरातील भेंडखळ रोडवर काही काळ थांबला असल्याचे उघड झाले आहे.

याप्रकरणी फिर्यादी सचिन सत्यनारायण शर्मा यांच्या तक्रारीवरून न्हावा शेवा पोलिसांनी चालक आणि त्याच्या साथीदारांविरोधात गुन्हा दाखल केला असून, पोलीस उपनिरीक्षक गणेश जयकर पाटील पुढील तपास करत आहेत.

## २० मे रोजी भारत बंदची हाक

मोठा प्रतिसाद मिळत आहे. केमिस्ट अँड डिस्ट्रीब्यूशन असोसिएशन रायगड डिस्ट्रिक्टचे अध्यक्ष लीलाधर पाटील आणि जिल्हा सचिव प्रवीण नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली उरण तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रीब्यूशन असोसिएशननेही बंदमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्हा संघटनेकडून तहसीलदार उद्धव कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुलाणी तसेच संबंधित विभागांना निवेदन देण्यात आले आहे.

## 'पुडी' सोडणाऱ्यांना चपराक

पुढाकारातून धरणातील गाळ काढण्याचे काम करण्यात आले होते. त्यावेळी इतरही काही राजकीय नेत्यांनी या कामासाठी सहकार्य केले होते.

सरकारकडे उमटे धरणाचा गाळ काढण्यासाठी पैसा नसतो, मात्र धरणाच्या सुशोभिकरणासाठी आणि दगडी बांधकामांसाठी कोट्यवधींचा निधी सहज उपलब्ध होतो, ही मोठी शोकांतिका आहे. नवीन धरणे उभारण्याची भाषा करणाऱ्या सरकारने आधी गाळाने भरलेल्या धरणांना गाळमुक्त करून पाण्याचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी संघर्ष समितीच्यावतीने करण्यात आली आहे. दरम्यान, उमटे धरणातील पाण्याबाबत सद्यःस्थिती जाणून घेण्यासाठी पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता सुयोग निकम यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

## खते, बियाणे विक्रीवर करडी नजर

७३ हजार हेक्टरवर भातलागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. जिल्ह्यात दोन हजार ८११ हेक्टर नाचणी लागवडीचे क्षेत्र असून, यावर्षी दोन हजार ५५० हेक्टरचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. खरीप हंगामासाठी रायगड जिल्ह्यास एक एप्रिल ते ३० सप्टेंबर या कालावधीत १४ हजार मेट्रिक टन रासायनिक खतांचे आवंटन प्राप्त झाले आहे. यात ११ हजार टन युरिया, ७०० टन डीएपी आणि एक हजार ५०० मेट्रिक टन मिश्र खतांचा समावेश आहे. आतापर्यंत एक हजार ६८७ मेट्रिक टन खतांचा पुरवठा झाला असून खरीप हंगामात टंचाई निर्माण होऊ नये म्हणून एक हजार १२० मेट्रिक टन संरक्षित साठा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यापैकी ९३८ मेट्रिक टन साठा उपलब्ध करण्यात आला आहे.बियाण्यांच्या बाबतीत जिल्ह्यासाठी १६ हजार ९५० क्विंटल बियाण्यांची मागणी नोंदविण्यात आली आहे. यात १६ हजार क्विंटल सुधारित आणि ६० क्विंटल संकरीत भात बियाणांचा समावेश आहे. महाबीजसह विविध खासगी कंपन्यांकडूनही बियाण्यांचा पुरवठा केला जाणार आहे. आतापर्यंत चार हजार ३३३ क्विंटल बियाणे उपलब्ध झाली असून, आवश्यकतेनुसार आणखी पुरवठा केला जाणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, जिल्ह्यात बियाणे, खते आणि किटकनाशकांचा अनधिकृत साठा, जादा दराने विक्री किंवा गैरवापर आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. सध्या जिल्ह्यात १८८ बियाणे विक्रेते, २४० खत विक्रेते आणि १३६ कीटकनाशक विक्रेते परवानाधारक आहेत. या सर्वांवर लक्ष ठेवण्यासाठी कृषी विभागाने जिल्हास्तरावर विशेष पथके तयार केली असून त्यांच्यामार्फत नियमित तपासणी सुरू करण्यात आली आहे. खते, बियाणे किंवा किटकनाशकांच्या विक्रीदरम्यान शेतकऱ्यांची अडवणूक, फसवणूक किंवा आर्थिक लूट होत असल्यास संबंधितांनी तात्काळ तालुका कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## टोरंट प्रकल्पाविरोधात एल्गार

पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा इशारा पर्यावरणप्रेमींनी दिला आहे.याशिवाय प्रकल्पासाठी उभारण्यात येणाऱ्या उच्चदाब वीजवाहिन्यांमुळे जंगलतोड वाढेल, वन्यप्राण्यांचे स्थलांतर मार्ग बाधित होतील आणि पक्ष्यांच्या नैसर्गिक अधिवासावर परिणाम होईल, असेही सांगितले जात आहे. मोठ्या प्रमाणात उभारण्यात येणारे लोखंडी टॉवर आणि ४०० केव्हीए क्षमतेच्या वीजवाहिन्यांमुळे शेती, पर्यटन आणि ग्रामीण जीवनमानावर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, टॉवर उभारणीसाठी वापरली जाणारी जमीन कायमची नापीक होऊ शकते. बांधकामासाठी मुरूम टाकणे, रस्ते तयार करणे आणि मोठ्या प्रमाणात खोदकाम केल्याने जमिनीची सुपीकता कमी होईल. उच्चदाब वाहिन्यांमधून निर्माण होणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक फील्डमुळे आरोग्यावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कर्जत पर्यावरण बचाव संघर्ष समिती यांनी टोरंट पॉवर प्रकल्पासह पोशिर आणि शिलार धरण प्रकल्पांनाही तीव्र विरोध दर्शवला आहे.

## लोकलची प्रतीक्षा संपणार कधी?

शासनाकडून मोठ्या गुंतवणुकीच्या घोषणा केल्या जात असल्या, तरी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न मात्र कायम दुर्लक्षित राहिल्याची भावना नागरिकांत आहे. दररोज हजारो नागरिक रोजगार, शिक्षण, व्यवसाय आणि वैद्यकीय कारणांसाठी पनवेल, नवी मुंबई आणि मुंबईकडे प्रवास करतात. मात्र एसटी बसेसची अपुरी संख्या, महामार्गावरील वाहतूक कोंडी, वाढते इंधन दर आणि खासगी वाहनांवरील वाढते अवलंबित्व यामुळे सामान्य प्रवासी त्रस्त झाले आहेत. अशा परिस्थितीत पेण-पनवेल लोकल सेवा ही सर्वसामान्यांसाठी मोठा दिलासा ठरू शकते. स्थानिकांच्या मते, विकासाच्या चर्चेत मोठमोठे प्रकल्प झळकतात; मात्र जनतेच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेला लोकल सेवेचा प्रश्न कायम मागे पडतो. एका बाजूला 'तिसरी मुंबई' उभारण्याची भाषा केली जाते, तर दुसऱ्या बाजूला त्या भागाला मुंबईशी जोडणारी मूलभूत रेल्वे सेवा वर्षानुवर्षे रखडलेली आहे. पेण परिसरातील युवक, कामगार, विद्यार्थी आणि व्यावसायिक यांचे जीवनमान सुधारण्यासाठी लोकल सेवा अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. रेल्वे सेवा सुरू झाल्यास प्रवास सुलभ होण्याबरोबरच औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, पर्यटन आणि स्थानिक बाजारपेठेलाही मोठी चालना मिळू शकते. पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक म्हणूनही या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे. निवडणुकांच्या काळात लोकल सेवेची आश्वासने देणारे लोकप्रतिनिधी आता या प्रकल्पासाठी नेमका किती पाठपुरावा करत आहेत, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. केंद्र आणि राज्य शासनाने तातडीने निर्णय घेऊन पेण-पनवेल लोकल प्रकल्पाला गती द्यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## ...जमिनी लाटण्याचा डाव?

निधी वापरण्यात येत आहे. गार्बेट वाडीतील बहुतांश लोक धनगर समाजातील असून, ते ओबीसी प्रवर्गात मोडतात. त्यामुळे आदिवासी भागासाठी असलेला निधी बिगर आदिवासी वस्तीसाठी वापरल्याचा आरोप आदिवासी समाजाकडून करण्यात येत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे. स्थानिकांच्या मते, गार्बेट परिसरातील वनहक्क कायद्यांतर्गत मिळालेल्या जमिनींवर काही राजकीय घटक आणि स्थानिक नेत्यांचा डोळा असून भविष्यात ''मिनी माथेरान'' प्रकल्पाच्या नावाखाली या जमिनी विकत घेण्याचे प्रयत्न होऊ शकतात. माथेरानशी ऐतिहासिक आणि सामाजिक नाळ जोडलेल्या गार्बेट परिसरात काँक्रीटचे जंगल उभे करण्याचा डाव असल्याचा आरोपही होत आहे. दरम्यान, माथेरानसमोरील ढाक डोंगर परिसराला पूर्वी ''प्रति माथेरान'' म्हणून ओळखले जात होते. भीमाशंकर अभयारण्याच्या रांगेतील हा घनदाट जंगलाचा भाग आता वीज प्रकल्पासाठी खासगी कंपनीकडे गेला असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे आता गार्बेट परिसरात ''मिनी माथेरान'' उभारणीच्या हालचाली सुरू झाल्याची चर्चा रंगू लागली आहे. माथेरान इको सेन्सेटिव्ह झोनमध्ये नवीन सिमेंट बांधकामे, मोठे खोदकाम आणि स्फोटक वापरण्यास निर्बंध आहेत. मात्र, गार्बेट परिसरात रस्ता बांधणीसाठी झाडांची तोड आणि काँक्रिटीकरण करण्यात आल्याने वन व पर्यावरण नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

## रायगडात सुक्या म्हावऱ्याची चलती

आणि, त्यांचे भावदेखील वधारतात. अशा वेळी घरात साठवून ठेवलेली सुकी मासळी काढली की मग जेवण चांगले जाते.

सुकी मासळीचे भाव प्रतिकिलो : १) साधे सोडे - १२०० ते १६०० रुपये, २) उच्च दर्जाचे सोडे - १८०० ते २००० रुपये, ३) बांगडा - २० व २५ रुपये १ नग, ४) अंबाडी- दर्जानुसार ५००, ६०० व ७०० रुपये, ५) सुकट - दर्जानुसार साधी २००, चांगली ३०० व ३५० रुपये, ६) बोंबील - ५०० रुपये., ७) खाडीचे बोंबील साईजनुसार ६०० ते ८०० रुपये, ८) माकुल - आत्ता ७०० ते ८०० रुपये. पण आवक कमी असल्याने उपलब्ध होत नाहीत., ९) पांढरी मोठी वाकटी - ६०० ते ७०० रुपये, १०) छोटी वाकटी - ४०० रुपये, ११) मांदेली - आत्ता २०० रुपये, १२) मासे सुकट/ दांडी सुकट (खारे) साधे ४००, उत्तम ५०० रुपये, १३) रेपटी - ४०० रुपये, १४) सुरमई - छोटी ६०० मोठी ८०० रुपये, १५) ढोमी - ३०० रुपये.



# घोणसे घाटात डिझेल टँकर पलटी

● मोठ्या प्रमाणात वित्त हानी, वाहतूक ठप्प, मोठी दुर्घटना टळली

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

दिघी-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील म्हसळा येथील घोणसे घाटात डिझेल वाहतूक करणारा टँकर पलटी झाल्याने रविवारी दुपारी वाहतुकीचा खोळंबा झाला. सुदैवाने या अपघातात जीवितहानी टळली असली तरी महामार्गावर डिझेलची गळती सुरू झाल्याने पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून दोन्ही बाजूंची वाहतूक तात्पुरती बंद केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, माणगावकडून म्हसळ्याकडे डिझेल वाहतूक करणारा टँकर क्रमांक एमएच ०४ एलई ८१३१ घोणसे घाटातील तीव्र उताराच्या वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने संरक्षण कठड्यावर जोरदार आदळला व पलटी झाला. ही घटना दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास घडली.

अपघातानंतर टँकरमधून मोठ्या प्रमाणात डिझेलची गळती सुरू झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. संभाव्य आग अथवा अन्य दुर्घटना टाळण्यासाठी पोलिस प्रशासनाने तातडीने घटनास्थळी धाव घेत वाहतूक बंद केली. त्यामुळे घाटमार्गावर वाहनांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.

घोणसे घाटातील अपघातग्रस्त ठिकाणी उभारण्यात आलेली मजबूत संरक्षण भिंत असल्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याची चर्चा नागरिकांत सुरू होती. अन्यथा टँकर दरीत कोसळून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान घोणसे घाटात सातत्याने अपघात होत असल्याने स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा शासनाकडे आंदोलन करून घाटमार्गातील धोकादायक वळणात बदल करण्याची मागणी केली होती.

घाटातील शेवटचे उतार वळण रस्ता विकासकाने चुकीच्या पद्धतीने तयार केल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत असून, गेल्या पाच वर्षांपासून या मार्गात सुधारणा करण्याची मागणी प्रलंबित आहे.

# नेरळची पै वाडी झाली ओसाड

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**नेरळ येथील स्वातंत्र्यसैनिक डॉ. पै यांची नेरळ विद्या मंदिर शाळेच्या बाजूला असलेली पै वाडी ओसाड झाली आहे. त्या ठिकाणी असलेली सर्व जुनी झाडे जमीन मालकाने तोडून टाकली आहेत. दरम्यान, ती झाडे परवानगी घेऊन तोडली असल्याचे वन खात्याचे म्हणणे आहे. तसेच, त्या जमिनीवर नवीन झाडे लावली जाणार असल्याचे वन विभागाकडून सांगितले जात आहे. परंतु, हजारो पक्षांचे निवारा असलेली झाडे तोडल्याने मोठा अनर्थ घडला आहे. याबाबत पर्यावरण प्रेमींनी प्रचंड नाराजी व्यक्त केली असून, वन विभागाच्या भूमिकेबद्दल संशय व्यक्त केला जात आहे.**





नेरळ येथील रेल्वे मार्गाला लागून असलेल्या स्वातंत्र्यसैनिक डॉ. पै यांच्या वाडीमधील झाडांवर हजारोंच्या संख्येने वटवाघूळ लटकलेले असत. सकाळ झाली की, ते वटवाघूळ पुन्हा अन्न शोधण्यासाठी झाडांपासून बाजूला होत सैर करायचे. त्यामुळे नेरळ विद्या मंदिर शाळेच्या बाजूला असलेली पै वाडी ही शेकडो वर्षे जुन्या झाडांची वाडी म्हणूनच ओळखली जायची. मात्र, मागील काही वर्षे नेरळ गावातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या पै वाडीची विक्री होणार, असे बोलले जात होते. सव्वातीन एकराचा हा महत्त्वाचा जमिनीचा तुकडा मिळवण्यासाठी गुंतवणूकदार विशेष प्रयत्न करीत होते. शेवटी या भूखंडाचा विकास करण्यासाठी सर्वात महत्त्वाची अडचण ही येथील झाडे बनली होती. तब्बल

**■ सर्व जुन्या झाडांची कत्तल**

**■ पक्ष्यांचा निवारा हिरावला**

१०० फूट उंचीची आणि जुनी झाडे ही जमिनीच्या विक्रीत अडथळा ठरत होती.

मागील काही दिवसांत वन विभागाची परवानगी घेऊन पै वाडीमधील बहुसंख्य म्हणून शंभरहून अधिक झाडांची कत्तल करण्यात आली आहे. तेथे असलेल्या झाडांचे बुंधे हे दोन व्यक्तीच्या कवेत मावतील अशी मोठी होती. अशा सर्व झाडांची कत्तल झाली असून, वन विभागाने वटवाघूळ या पक्षाचा निवास आणि निवारा असलेली सर्व झाडे तोडण्याची परवानगी दिलीच कशी, असा प्रश्न मानवाधिकार कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे. वन विभागाने ही झाडे तोडण्याची कार्यवाही केल्याने वन विभागाच्या भूमिकेबद्दल संशय व्यक्त होत आहे. वटवाघूळ हा काहीसा दुर्मिळ होत चाललेला पक्षी नेरळमधून हद्दपार करण्याची महत्त्वाची भूमिका वन विभागाने येथील झाडे तोडण्यास परवानगी दिल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

दरम्यान, वन विभाग माध्यमांशी बोलताना पै वाडीचे जमीन मालकाची बाजू घेताना दिसत आहेत. तेथे संबंधित जमीन मालक नवीन झाडे लावणार असल्याचे वनपाल सांगत आहेत. ही बाब संशयास्पद असून नेरळ गावातील तीन एकरातील जुन्या झाडांचा समूह जमीनदोस्त झाल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. मात्र, पडद्यामागून तेथे इमारती उभ्या राहणार असल्याचे जाहीरपणे स्थानिकांकडून बोलले जात आहे. त्यामुळे पै वाडी झाडांच्या तोडल्याने ओसाड झाली आहे.

# पालिकेच्या निकृष्ट कामावर संताप

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेकडून गेल्या अनेक महिन्यांपासून खारघर परिसरात ''खड्डेमुक्त रस्ते'' आणि ''उत्तम दर्जाचे रस्ते'' झाल्याचा गाजावाजा केला जात आहे. विविध माध्यमांमधून चांगल्या कामाची प्रसिद्धी केली जात आहे. परंतु, वास्तव परिस्थिती पूर्णपणे वेगळी आणि चिंताजनक आहे. याबाबत स्थानिक नागरिकांसह शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने संताप व्यक्त केला आहे.

खारघर सेक्टर १७, १६ आणि १५ या भागातील अत्यंत वर्दळीचा मुख्य रस्ता पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत असले, तरी प्रत्यक्षात



रस्त्याच्या मध्यभागी असलेले ड्रेनेज झाकण (चेंबर) रस्त्यापेक्षा ५ ते १० इंच खाली आहे. त्यामुळे

**■ खड्डेमुक्त रस्त्यांचा गाजावाजा**

**■ ठाकरे गटाकडून चिंता व्यक्त**

वाहन चालवताना अचानक धक्का बसून अपघाताचा धोका वाढला आहे. अनेक ठिकाणी रस्त्याच्या कडेला खड्डे/खटक्या असल्याने विशेषतः दुचाकीस्वारांना धोका निर्माण झाला आहे. आधीच अनेक किरकोळ अपघात घडले असून, मोठ्या दुर्घटनेची शक्यता नाकारता येत नाही. हे सर्व असूनही संबंधित यंत्रणेकडून याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे हा पूर्ण झालेला रस्ता आहे का? कामाचा दर्जा तपासला गेला आहे का? एखादा गंभीर अपघात झाल्यावरच कारवाई होणार का? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तसेच, या ठिकाणची तात्काळ रस्त्याची तांत्रिक पाहणी करण्यात यावी. ड्रेनेज झाकण व रस्त्याची पातळी समतोल करण्यात यावी. दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. नागरिकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देऊन कामाची पुनर्तपासणी करावी, अशी मागणी खारघर सेक्टर १६ येथील रहिवाशी व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपशहर प्रमुख नंदु वारुंगसे यांनी केली आहे.

# आदिवासी पाड्यावर पाणीटंचाई



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलमधील कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी शेजारील आदिवासी पाड्यावर तीव्र पाणीटंचाईची झळ जाणवू लागली आहे. या ठिकाणी एक दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. कडक उन्हामुळे लहान मुलांनाही तहान सहन करणे कठीण झाले असून, आलेल्या नळाच्या पाण्यावरच ते तहान भागवत आहेत. उन्हाचा वाढता पारा आणि अपुरा पाणीपुरवठा यामुळे आदिवासी बांधव चिंतेत पडले आहेत. त्यामुळे प्रशासनाने नियमित पाणीपुरवठा करण्याची मागणी होत आहे.

# मुख्य रस्त्यावर सांडपाणी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल येथील रायगड कृषी उत्पन्न बाजार समितीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर दररोज मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने वाहनचालक व नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यालगत असलेल्या ड्रेनेज लाईन्समधून दुर्गंधीयुक्त सांडपाणी थेट रस्त्यावर येत असल्याने परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या मार्गावर नेहमीच मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून, बाजार समितीत येणारे शेतकरी, व्यापारी तसेच स्थानिक रहिवासी हैराण झाले आहेत. दुर्गंधी, डासांची वाढ आणि खराब



झालेला रस्ता यामुळे नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. पावसाळा तोंडावर असताना ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता असून, संबंधित विभागाने तातडीने नाले व ड्रेनेज लाईन्सची साफसफाई करून कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बदली

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

राज्याच्या गृह विभागाने पोलीस प्रशासनात मोठे फेरबदल केले असून, अपर पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक आणि पोलीस उपआयुक्त श्रेणीतील अधिकाऱ्यांच्या बदल्या तसेच पदोन्नतीचे आदेश जारी केले आहेत. या फेरबदलात नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये मोठे बदल झाले असून, अनेक अनुभवी अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत, तर काहींना पदोन्नती मिळाली आहे.

नवी मुंबईचे पोलीस सह-आयुक्त संजय येनपुरे यांची मुंबईत विशेष पोलीस महानिरीक्षक या महत्त्वपूर्ण पदावर बदली करण्यात आली आहे. त्यांच्या जागी नवी मुंबईचे अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे यांची पदोन्नतीने पोलीस सह-आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तर, नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात कार्यरत असलेल्या ५ उपायुक्तांच्या बदल्या इतर शहरात करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये परिमंडळ-१चे पोलीस उपआयुक्त पंकज डहाणे यांची पोलीस उपायुक्त-बृहन्मुंबई, परिमंडळ-३ चे उपआयुक्त प्रशांत मोहिते यांची उपआयुक्त-छत्रपती संभाजीनगर शहर, उपआयुक्त संजय पाटील यांची उपआयुक्त-पिंपरी चिंचवड, वाहतूक विभागाचे उपआयुक्त तिरुपती काकडे यांची पोलीस अधीक्षक-महामार्ग सुरक्षा आणि डायल-११२च्या पोलीस उपआयुक्त प्रिती टिपरे यांची पोलीस उपआयुक्त म्हणून मिरा-भाईंदर-वसई-विरार येथे बदली करण्यात आली आहे. त्यांच्याजागी प्रकटीकरण-१चे पोलीस उपआयुक्त विशाल ठाकूर, राज्य गुप्तवार्ता विभागाचे उपआयुक्त योगेश चव्हाण, अन्न-औषधी प्रशासनचे पोलीस अधीक्षक राहुल खाडे आणि पोलीस महासंचालक कार्यालयातील सहाय्यक विशेष पोलीस महानिरीक्षक विजय खरात यांची बदली करण्यात आली आहे. तर, राज्य महामार्ग सुरक्षाचे पोलीस अधिक्षक तानाजी चिखले यांची डायल-११२ या पदावर बदली करण्यात आली आहे.

# नालेसफाईअभावी भीतीचे वातावरण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पावसाळा तोंडावर आला असताना पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अनेक नाल्यांची अद्यापही साफसफाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः नवीन पनवेलमधील सेक्टर १७, १९ आणि ६ परिसरातील रहिवाशांनी प्रशासनाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली आहे. दरवर्षी मुसळधार पावसामुळे नवीन पनवेलमधील विविध सेक्टरमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचते. रस्ते जलमय होत असल्याने नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होते.

# पोलिसांचा ड्रग्स पेडलर्सना इशारा




**। कळंबोली । प्रतिनिधी ।**

तरुणाईला ड्रग्ज आणि विविध व्यसनांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी आणि एक निरोगी समाज निर्माण करण्यासाठी कळंबोली पोलीसांच्यावतीने शनिवारी (दि.१६) नशामुक्त शहर जनजागृती, मार्गदर्शन व समुपदेशन अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. कळंबोली सेक्टर-१६ येथील रोडपाली बस डेपो येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात पोलीस अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी अमली पदार्थ विक्रेत्यांवर अत्यंत कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

या विशेष जनजागृती मोहिमेचे आयोजन कळंबोलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते आणि अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांनी केले होते. यावेळी बोलताना सहाय्यक पोलीस आयुक्त विक्रम कदम यांनी, अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर कडक शब्दांत प्रहार केला. ''कळंबोली परिसरात कोणत्याही प्रकारच्या अमली पदार्थांची विक्री किंवा वाहतूक खपवून घेतली जाणार नाही. ड्रग्ज पेडलर्सवर पोलीस प्रशासन अत्यंत कठोर कायदेशीर कारवाई करणार आहे,'८ असा थेट इशारा त्यांनी दिला.

# महाकाली देवीची यात्रा उत्साहात

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा येथील त्वष्टा कासार ज्ञाती संस्थानाच्यावतीने श्री महाकाली देवीची वाडी भरणे व वार्षिक यात्रा महोत्सव रविवार (दि.१७) चौल येथील श्री महाकाली मंदिरात मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात संपन्न झाला.

सकाळी साडेआठ वाजता चंद्रकांत दांडेकर यांच्या निवासस्थानापासून निघालेल्या भव्य पालखी सोहळ्याने परिसर दुमदुमून गेला. सकाळी ११.०० वाजता केदार निजामपूरकर व राधिका निजामपूरकर यांच्या हस्ते देवीची महापूजा व वाडी भरणे सोहळा विधिवत पार पडला. दुपारी १.०० वाजता महाआरती



संपन्न झाली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका डॉ. निलम हजारे, अॅड. किशोर हजारे यांच्यासह उद्योजक तन्वी हजारे व सागर हजारे हे उपस्थित होते. दुपारी २.०० वाजता स्थानिक महिलांचे सांस्कृतिक कार्यक्रम व सायंकाळी साडेपाच वाजता श्री महाकाली भजन मंडळाच्या भजनाने भाविक मंत्रमुग्ध झाले. संस्थेचे अध्यक्ष ऋषी वडके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाह गणेशवडके, खजिनदार अमोल वडके, सदस्य ओमकार वडके, प्रशांत वडके, शंकर वडके व मंगेश वडके यांनी यशस्वी आयोजन

**घोडेवाल्यांच्या जागेवर फिरवला जेसीबी | वन-महसूल विभागाची डोळ्यावर पट्टी**

# वाहनतळाच्या नावाखाली माती उत्खनन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरानमध्ये वन विभागाने डोळ्यावर पट्टी बांधली असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर बेकायदा उत्खनन सुरू आहे. शहरातील वाहनतळ समस्येचे कारण पुढे करून दस्तुरी येथील वाहन तळाच्या ठिकाणी बेकायदा जेसीबी मशीनच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात आले आहे. दरम्यान, तेथील मालवाहू घोड्यांचे उभे राहण्याचे ठिकाण हिरावले गेले असून, घोडेवाल्यांचे तबेले तोडण्यासाठी पोलीस बंदोबस्त घेऊन येणारे वन विभाग आता आहे कुठे, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



माथेरान या ठिकाणी देशासह विविध देशातील पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असतात. माथेरान हे पर्यावरणाच्या दृष्टीने पर्यावरण पूरक थंड हवेचे ठिकाण आहे. या ठिकाणी कुठल्याही प्रकारे वाहनाला बंदी आहे. त्यामुळे माथेरानमध्ये उपलब्ध असणारे वाहन तळ हे पर्यटकांची वाहने उभी करण्यासाठी अपुरे पडत आहेत. पर्यटकांना माथेरान घाट रस्त्यात, तर काही पर्यटकांना जुम्मापट्टी या आदिवासी वाडीमध्ये आपली वाहने उभी करून पुढे माथेरान येथे प्रवासी टॅक्सीने जावे लागते. माथेरानच्या वाहन तळाला लागून असलेला एमपी ९३ हा प्लॉट शासनाच्या मालकीचा आहे. या भूखंडाचे सपाटीकरण जेसीबीचा वापर करून करण्यात आले आहे. हा भूखंड माथेरान नगरपरिषदेकडे हस्तांतरण झालेला नाही आणि तरीदेखील खोदकाम केले गेले आहे. याबाबत वन विभाग आणि महसूल विभाग यांनी कोणतीही कारवाई केली नाही. वाहन तळाच्या नावाखाली सपाटीकरण सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. एमपी ९३ या प्लॉटमध्ये एक जुने इमारत होती. ती इमारत आता वाहन तळाच्या जागेसाठी तीन जेसीपी यांच्या सहाय्याने पाडण्यात आली. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उत्खनन देखील झाले. मात्र, यावर वन आणि महसूल विभागाने कोणतीही कारवाई केली नाही. तसेच, या ठिकाणी जे मालवाहतूक घोडेस्वार उभे राहायचे त्यांना देखील या ठिकाणावरून हटविण्यात आले आहे. त्यामुळे याबाबत माथेरानमध्ये उलटसुलट चर्चा सुरू आहेत.

## शासनाची बघ्याची भूमिका

एमपी ९३ हा प्लॉट महसूल विभागाच्या ताब्यात असून माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या ताब्यात दिलेला नाही. मात्र, तरी देखील या प्लॉटमध्ये सध्या काम चालू असल्याने शासन कोणतीही कारवाई करीत नाही, याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे. त्यामुळे शासन फक्त बघ्याची भुमिका घेत असल्याच्या चर्चा माथेरानकरांमध्ये सुरू आहेत.

# निवडक

## सडलेला खांब बदलण्याची मागणी



**श्रीवर्धन :** येथील आयार मोह परिसरात महावितरण कंपनीचा विद्युत वाहक खांब सडलेल्या अवस्थेत असून, पावसाळा सुरू होण्या अगोदर खांब बदलण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे. आयार मोहल्ला परिसरात एका घरा लगत महावितरण कंपनीने विद्युत वाहक खांब उभारला आहे. वर्षानुवर्षे घरा लगतचा खांब बदलण्यात आला नाही. खांबाच्या पायालगत बंद अवस्थेतील वीज वितरण बिंदू (डीपी) आणि अस्ताव्यस्त पसरलेल्या विद्युत वाहिन्यांचा त्रास पादचाऱ्यांना होत आहे. विद्युत वाहक खांबाची जीर्ण अवस्था झाली असून, पायाजवळ सडलेला खांब कधीही कोसळू शकतो. महावितरण कंपनीने श्रीवर्धन शहरात पावसाळी पूर्व कामांना सुरुवात केली असून, हा सडलेल्या अवस्थेतील खांब बदलावा, जेणेकरून पावसाळी दिवसांत विद्युत वाहक खांब कोसळून कोणतीही दुर्घटना घडू नये. अशी अपेक्षा स्थानिक करीत आहेत.



## कळंबोली पोलिसांचे कौतुक

**पनवेल :** कळंबोली शहरातील जनतेच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असलेल्या कळंबोलीचे पोलीस कर्मचारी आकाश वानखेडे आणि सागर माळी यांनी आपल्या धाडसी कृतीतून एका महिलेचा जीव वाचवत मानवतेचे आणि कर्तव्यनिष्ठेचे उत्कृष्ट उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. रोडपाली तलाव परिसरात एक महिला बुडत असल्याची माहिती मिळताच दोन्ही पोलिसांनी कोणतीही वेळ न दवडता घटनास्थळी धाव घेतली. स्वतः च्या जीवाची पर्वा न करता त्यांनी तलावात उतरून महिलेची सुखरूप सुटका केली. त्यांच्या या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली असून, परिसरातून दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांचे कौतुक करण्यात येत आहे. दरम्यान, त्यांच्या या शौर्यपूर्ण, साहसी आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत कळंबोली शहर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने आकाश वानखेडे आणि सागर माळी यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.




## महाविद्यालयात पदवीदान समारंभ

**कर्जत :** कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयाचा पदवीदान समारंभ महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये पदवीदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. काळे यांनी, प्रास्ताविकात संस्थेची व महाविद्यालयाची माहिती सांगून विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयाकडे जाण्यासाठी खूप मेहनत घ्यावी, असे सांगितले. त्यानंतर फार्मसी महाविद्यालयातील पदवीधर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदव्या प्रदान करण्यात आल्या. प्रदीपचंद्र श्रृंगारपुरे, तेजराज जैन, अन्वेषा मुथा, विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, डॉ. विलास पिल्लेवान, डॉ. निलोफर खान, डॉ. जितेंद्र यादव, डॉ. स्वप्नील फालक, प्रा. निलेश बोंडे, प्रा. स्वीटी भोपी, प्रा. श्वेता कर्वे, प्रा. धनश्री शिंदे, सविता म्हात्रे, पल्लवी जुईकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुष्मिता मजली आणि प्रा. सोनम सोनवणे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. अश्विनी भोईर यांनी केले.




## बळीराजाची खरीप हंगामासाठी तयारी

**पनवेल :** सध्या वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे सर्वसामान्य नागरिक हैराण झाले असून, आता सर्वांचे लक्ष पावसाच्या आगमनाकडे लागले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील बळीराजा येणाऱ्या खरीप हंगामासाठी तयारीला लागल्याचे चित्र दिसत आहे. पनवेल तालुक्यासह रायगड जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये शेतकरी पेरणीपूर्व नियोजन करत आहेत. बाजारपेठांमध्ये तसेच बी-बियाणे विक्री केंद्रांवर शेतकऱ्यांची गर्दी वाढू लागली आहे. विविध प्रकारचे दर्जेदार बी-बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकरी मोठ्या प्रमाणावर दुकानदारांकडे चौकशी करताना दिसत आहेत. यंदा वेळेत पाऊस पडून चांगले उत्पादन मिळावे, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. भात, नाचणी, बाजरी तसेच विविध भाजीपाला पिकांच्या बियाण्यांना अधिक मागणी असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. दरम्यान, गेल्या काही वर्षांतील बदलत्या हवामानामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता असली, तरी यावर्षी निसर्ग साथ देईल आणि भरघोस पीक येईल, असा आशावाद शेतकरी राजामध्ये दिसून येत आहे.

# महागाईचे दांडके

नरेंद्र मोदी सरकारने अखेर महागाईचे दांडके मायबाप जनतेच्या टाळक्यात हाणले आहे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका होईपर्यंत हे दांडके लपवून ठेवण्यात आले होते. बंगालसह सर्वत्र मनासारखे घडवल्यावर ते बाहेर काढण्यात आले. दांडके हाणण्याआधी मोदींची व्याख्याने झाली. काळ कसा कठीण आहे आणि लोकांनी कशी बचत करायला हवी असे उपदेश मोदींनी केले. देशाचे परकीय चलन वाचवा, त्यासाठी सोने खरेदी करू नका, पेट्रोल कमी वापरा, परदेशात जाऊ नका असे मोदी सांगू लागले. हा उपदेश मोदी व त्यांचे भक्त यांना अर्थातच लागू नाही. एकीकडे लोकांना सल्ले देता देता मोदींचे रोड शो चालूच होते. त्यापूर्वी दोनच दिवस आधी गुवाहाटी आणि कोलकाता इथे अत्यंत श्रीमंती थाटात नवीन मुख्यमंत्र्यांचे शपथविधी झाले होते. त्यासाठी २५ ते ५० चार्टर विमाने करून विविध राज्यातून भाजपचे नेते आले. आपण बोलतो काय आणि करतो काय याची तमा बाळगण्याचे मोदींना काही कारणच नाही. आपल्या मागे त्यांनी अंधभक्तांचे अभेद्य जाळे उभारून ठेवले आहे. मोदींनी काहीही केले तरी देशाच्या भल्यासाठीच केले असेल असा दिवसरात्र प्रचार करणे हे एकच काम हे भक्त करतात. भोळीभाबडी जनता त्यावर विश्वास ठेवते. लोकांना परदेश दौरे करू नका असे सांगून मोदी नेदरलँड्सला पाच देशांच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. ते जाताच इकडे सीएनजी आणि पेट्रोल व डिझेलचे दर वाढवण्यात आले. पूर्वी उत्तर प्रदेश निवडणुकांच्या वेळीही अशीच भाववाढ रोखून धरण्यात आली होती. निवडणुका होताच आठ ते नऊ वेळा दोन-तीन रुपयांची वाढ करून अंतिमतः मोठा दणका देण्यात आला. पण भारतातील जनता आता इतकी अल्पसंतुष्ट झाली आहे की, मधला काही काळ तरी सरकारने भाव रोखून धरले हे मोदींचेच आपल्यावर जणू उपकार आहेत असे ती मानून चालते. त्यामुळे अशी भाववाढ झाली तरी ती पेटून उठत नाही. आतादेखील हेच होणार आहे. सध्या तीन रुपयांनीच पेट्रोल वाढले असले तरी येत्या काही दिवसात थोडी थोडी करून आणखी वाढ होणार आहे.

## आश्रितांची लोकशाही

इराणचे युध्द २८ फेब्रुवारीला सुरू झाले. आपण ८५ टक्के तेल बाहेरून व मुख्यतः आखातातून आयात करतो हे जगजाहीर आहे. युध्दामुळे क्रूड तेल व गॅसचा पुरवठा थांबणार आणि त्यांच्या किंमती वाढणार हे स्पष्ट दिसत होते. पण भारतावर याचा काहीच परिणाम होणार नाही, सर्व काही उत्तम चालले आहे असा मोदी सरकारचा आविर्भाव होता. एकेकाळी हेच मोदी आणि त्यांचा भाजप एक किंवा दोन रुपयांनी पेट्रोल वाढले तरी देश डोक्यावर घेत होते. सीएनजी, पेट्रोल व डिझेलच्या दरवाढीमुळे सार्वत्रिक भाववाढ होणार आहे. आपला बहुतांश औद्योगिक माल, रोजचा किराणा, दूध, भाजीपाला यांची वाहतूक रस्तेमार्गेच होते. पेट्रोल वाढले की यांचे भावही वाढणार आहेत. सीएनजी वाढताक्षणी शहरातील रिक्षा व टॅक्सीचालकांनी आपल्याही वाढ व्हावी अशी मागणी केली आहे. एसटी तसेच बेस्टसारख्या बस सेवांचे भाव आज ना उद्या वर जाणारच आहेत. यामुळे सामान्य नोकरदार किंवा हातावर पोट असलेल्यांच्या रोजच्या प्रवासाच्या खर्चात प्रचंड वाढ होणार आहे. दुर्दैवाने या लोकांचे पगार किंवा उत्पन्न हे या वाढीच्या प्रमाणात व तितक्या वेगाने वाढत नसते. याने अनेक लोक गरीब रेषेच्या जवळ ढकलले जाणार आहेत. भारतात न दिसणारी गरिबी किंवा डिसगाईज्ड पॉव्हर्टी कायम अस्तित्वात होती. आता अशा छुप्या गरिबांची संख्या वाढणार आहे. केंद्र सरकार ८० कोटी लोकांना रेशनवर फुकट धान्य देत असल्याने अगदीच भूकबळी पडण्याचे प्रमाण कदाचित कमी झाले असेल. पण माणसांचे व कुटुंबाचे जीवन यामुळे सुधारत नाही. ते केवळ जेमतेम जिवंत राहण्याच्या पातळीवरच राहते. बरे, हे धान्य मिळण्यासाठी सरकारच्या दयेवर ते अवलंबून असल्याने भाववाढ झाली तरी आंदोलन वगैरे करण्याचा विचार ते करू शकत नाहीत. एकीकडे लाडक्या बहिणीसारख्या योजना आणि दुसरीकडे फुकट धान्यवाटप यातून मोदी सरकारने या देशात कोट्यवधी आश्रित निर्माण करून ठेवले आहेत.

## सरकार काय करणार?

गेल्या तीन महिन्यातच नव्हे तर एकूणच बारा वर्षात मोदी आणि मंडळींनी भाजपच्या स्वार्थासाठी देशाच्या अर्थव्यवस्थेकडे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. आपण विश्वगुरु झालो किंवा चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था झालो असे फुकाचे बडेजाव मिरवण्यात दिवस निघून गेले आहेत. आखाती युध्द सुरु होताच युरोपपासून चीनपर्यंत सर्व देशांनी आणीबाणीचे कमीअधिक उपाय योजले. मोदी मात्र स्वतःच्या धुंदीत मस्त राहिले. आता राहुल गांधी यांनी म्हटल्याप्रमाणे त्या धुंदीची किंमत जनतेला चुकवावी लागणार आहे. इतके दिवस आपली स्पर्धा जर्मनी किंवा अमेरिकेशीच आहे असा आभास निर्माण केला जात होता. आपल्याकडे परकीय चलनाचे विक्रमी साठे असल्याचे सांगितले जात होते. प्रत्यक्षात शेअर बाजार व इतर ठिकाणच्या परकीय गुंतवणुकीमुळे हे चलन आपल्या खात्यात दिसत होते. ज्याक्षणी आपल्या दलाल स्ट्रीटचा बाजार उठला त्याक्षणी परकीय भांडवल काढून घेण्यास सुरुवात झाली. त्यामुळे तो साठा झपाट्याने कमी झाला. परकीय गुंतवणुकदारांनी भारतात येणे कमी केले आहे. आपले उद्योगपती भारतात नवी गुंतवणूक करण्यास तयार नाहीत. हे सर्व सरकारनेच दिलेल्या आकड्यांवरून दिसते. तरीही आपल्या अर्थमंत्री निर्मलाक्का तीस मार्चला याबाबत सवाल केला असता विरोधकांवरच टीका करीत होत्या. हा सर्व मोदीविरोध आहे व देशाचे उत्तम चालले आहे असे उत्तर त्यांनी भर संसदेत दिलेले आहे. मग आता अवघ्या ४५ दिवसात, एकाएकी परकीय चलनाचे संकट कसे काय निर्माण झाले हे त्यांनी आता सांगायला हवे. परवा सीएनबीसी १८ या नामांकित वाहिनीने एक बातमी दिली. परदेशी प्रवासावर बंधने घालण्याचा केंद्र सरकार विचार करीत आहे असे तिच्यात म्हटले होते. ही बातमी चुकीची आहे असा खुलासा दस्तुरखुद्द मोदींनी आपल्या ट्विटर खात्यावरून केला. वास्तविक सरकारकडे इतके प्रसिध्दी अधिकारी, प्रवक्ते, मंत्री आहेत. पण देशाची प्रतिमा सावरण्यासाठी स्वतः मोदींना मैदानात उतरावे लागले. यावरून स्थिती किती गंभीर आहे हे लक्षात यावे. ते झाल्याने, मूळ बातमीत काहीतरी तथ्य असावे असा तर्क कोणी केला तर ते चुकीचे म्हणता येणार नाही. लोकांनी बचत करावी, सोने खरेदी करू नये इत्यादी उपदेश झाल्यावर आता महागाई वाढवून त्यांच्या खिशातले पैसे काढून घेतले गेले आहेत. आता सरकार खर्चात कुठे आणि कशी कपात करणार हे पाहणे महत्वाचे आहे. मोदी आणि मंडळींचे दौरे चालूच ठेवून लोकांच्या उपयोगाच्या आरोग्य, शिक्षण किंवा सिंचन यासारख्या गोष्टींवरचे सरकारी खर्च कमी होणार असतील ते आक्षेपार्ह असेल.

**विचार**

# अस्तित्वालाच धक्का...

***देश पातळीवर अनुभवाला येणाऱ्या घडामोडींमधून पक्षांप्रमाणेच आघाडीचे राजकारणही संदेश घेत असते. हा संदेश त्या त्या परिस्थितीमध्ये आपल्या ध्येयधोरणांमध्ये बदल करण्याची गरज प्रतिपादीत करत असतो. त्या दृष्टीने बदलाची तयारी दाखवणे कालसुसंगत ठरते, मात्र तसा लवचिकपणा न दाखवल्यास राजकीय आघाड्यांच्या अस्तित्वालाच धका बसू शकतो. 'इंडिया' आघाडीच्या बाबतीत असेच काही घडताना दिसत आहे.***



**महेश जोशी**

देशाचे राजकारण सतत कूस पालटत असते. नवनवीन वळणे घेत असते. अनेक पक्षांसाठी हा बदलाचा सांगावा असतो. पक्षांप्रमाणेच आघाडीचे राजकारणही या बदलांमधून काही एक संदेश घेत असते. हा संदेश त्या त्या परिस्थितीमध्ये आपल्या ध्येयधोरणांमध्ये बदल करण्याची गरज प्रतिपादीत करत असतो. त्या दृष्टीने बदलाची तयारी दाखवणे कालसुसंगत ठरते, मात्र तसा लवचिकपणा न दाखवल्यास राजकीय आघाड्यांच्या अस्तित्वालाच धका बसू शकतो. सध्या देशात असेच काही घडताना दिसत आहे. पश्चिम बंगाल, केरळ आणि तामिळनाडूमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीचा निकाल समोर आल्यानंतर मतदारांनी सत्ता परिवर्तनाचा जनादेश दिल्याचे स्पष्ट झाले. पश्चिम बंगालमधे पंधरा वर्षे भक्कम असलेला ममता बॅनर्जींचा गड भाजपाच्या सुनामीमध्ये कोसळला आणि सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे पहिले सरकार स्थापन झाले. केरळमधे पिनराई विजयन यांच्या नेतृत्वाखालील कम्युनिस्टांचे सरकार पडले आणि काँग्रेसप्रणित आघाडीचा सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला. आसाममध्ये भाजपाने सत्तास्थापनेची हॅटट्रीक केली. तामिळनाडूमध्ये मतदारांनी द्रमुक आणि अण्णा द्रमुक या दोन्ही द्रविड पक्षांना नाकारले आणि सुपरस्टार अभिनेता विजय यांच्या टीव्हीके पक्षाचे सर्वाधिक १०८ आमदार निवडून दिले. पुदुच्चेरीमध्ये भाजपाने सत्ता कायम राखली. लोकसभेत शंभर खासदार असलेल्या काँग्रेस पक्षाला केरळच्या विजयाने दिलासा मिळाला.

गेली तीन टर्म काँग्रेसकडे केंद्राची सत्ता नाही. देशात बावीस राज्यांमध्ये भाजपाप्रणित एनएडीएचे सरकार सत्तेत आहे. देशात अठरा मुख्यमंत्री भाजपाचे आहेत. तरीही प्रादेशिक पक्षांना विश्वासात घेणे आणि इंडिया आघाडीतील मित्रपक्षांना सन्मानाने बरोबर ठेवणे काँग्रेसला जमत नाही किंवा समजत नाही, असे ताज्या निकालानंतर पहायला मिळत आहे. तामिळनाडूमध्ये द्रमुक हा काँग्रेसचा जुना आणि दीर्घकाळ बरोबर असलेला मित्रपक्ष आहे. काँग्रेस पक्ष तेथे स्वबळावर लढू शकत नाही. विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेसने द्रमुकबरोबर युती केली होती. काँग्रेसचा देशाच्या राजकारणात भाजपा हा क्रमांक एकचा राजकीय शत्रू असताना मोठे निर्णय घेताना मित्रपक्षांना विश्वासात घेणे आवश्यक आहे. काँग्रेस आणि द्रमुक हे पक्ष गेली अनेक वर्षे युती करून लढत आहेत. पण तामिळनाडूमध्ये सरकार स्थापन करण्यासाठी काँग्रेसने टीव्हीकेचे प्रमुख विजय यांना परस्पर पाठिंबा देऊन टाकला. द्रमुक आणि अण्णा द्रमुक हे दोन्ही पक्ष वर्षानुवर्षे एकमेकांच्या विरोधात लढत आहेत. दोन्ही पक्षांनी विजय यांना पाठिंबा देण्यास नकार दिला. तामिळनाडूमध्ये भाजपाने अण्णा द्रमुकशी युती केली असली तरी भाजपाचा एकच आमदार निवडून आला. नंतरच्या काळात सरकारस्थापनेला विलंब झाला तरी विजय हेच मुख्यमंत्री होणार आणि त्यांच्या टीव्हीके पक्षाची सत्ता येणार हे सर्वश्रुत होते. पण सत्तेत वाटा मिळवण्यासाठी विजय यांना घाईघाईने पाठिंबा देताना काँग्रेस किती अगतिक झाली होती, हेच दिसून आले.

काँग्रेस हा इंडिया आघाडीतील प्रमुख पक्ष आहे. लोकसभा आणि राज्यसभेत विरोधी पक्षनेते काँग्रेस पक्षाचे आहेत. पण काँग्रेस पक्ष पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ किंवा पंजाबमध्ये तेथील प्रादेशिक पक्षांशी मैत्रीचे वा विश्वासाचे संबंध ठेवत नाही. त्याचा परिणाम इंडिया आघाडीवर होतो आणि विरोधी पक्ष भाजपप्रणित एनडीएसमोर कमकुवत होतो. ममता बॅनर्जी या काँग्रेसमध्ये असताना पश्चिम बंगालमध्ये डाव्या पक्षांशी आक्रमकपणे लढत असत. मात्र राज्यातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते डाव्या पक्षांशी मिलीभगत करत असत. त्यामुळेच ममता यांनी संतापून 'एकला चलो रे'ची भूमिका घेतली. देशपातळीवर आपण इंडिया आघाडीत आहोत पण राज्यात आम्ही एकटे लढू, अशी या पक्षाची कायम भूमिका असते. तृणमल काँग्रेस स्थापन केल्यापासून ममताजींनी काँग्रेसचे नेतृत्व किंवा वर्चस्व कधीच मान्य केले नाही. पश्चिम बंगालमध्ये ममता आणि तामिळनाडूमध्ये स्टॅलिन यांच्या झालेल्या पराभवानंतर इंडिया आघाडीचे भवितव्य काय हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. हे दोन्ही नेते इंडिया आघाडीचे भक्कम आधार होते. संसदेत काँग्रेस, सपा, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुक एकत्र आले की भाजपा सरकारला नमते घ्यावे लागते, हे महिला आरक्षण विधेयकाच्या वेळी दिसून आले. सपा व द्रमुक या दोन पक्षांनी काँग्रेसला सदैव भक्कम साथ दिली. तृणमूल काँग्रेस आपल्या काही मुद्यांवर, विशेषत: प्रादेशिक प्रश्नांवर कोणाशीही तडजोड करत नाही हे अनेकदा दिसून आले आहे.

काँग्रेसने केरळमध्ये डाव्या पक्षांच्या आघाडीचा पराभव केला, तर पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या विरोधात निवडणूक लढवली. पश्चिम बंगालमध्ये राहुल गांधींनी ममता बॅनर्जींवर अतिशय तिखट शब्दात टीका केली. निवडणुकीत केलेली टीका किंवा आरोप हे सर्व समजून घेता येईल. मात्र तामिळनाडूमध्ये काँग्रेसने द्रमुकबरोबर युती करून निवडणूक लढवली आणि निकालानंतर लगेचच विजय यांना पाठिंब्याचे पत्र दिले. काँग्रेसच्या या दुटप्पी भूमिकेमुळे स्टॅलिन संतप्त झाले. सत्तेत सहभागी होण्यासाठी काँग्रेसने केलेले हे संधीसाधूपणाचे राजकारण आहे, अशी टीका द्रमुकने केली. काँग्रेस पक्ष विजय यांच्या सरकारमधे सामील झाल्यास द्रमुकच्या लोकसभेतील २२ आणि राज्यसभेतील आठ खासदारांचे समर्थन काँग्रेसला कसे मिळेल? तामिळनाडूमधील काँग्रेसच्या नेत्यांना स्टॅलिनबरोबर जायचे नसते, पण राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांच्या आदेशामुळे तेथे युती होते, हा आजवरचा अनुभव आहे. तामिळनाडूमध्ये लोकसभेच्या ३९ जागा आहेत. २०२९ ची लोकसभा निवडणूक जिंकायची असेल तर विजय यांच्याबरोबर राहीले पाहिजे असे काँग्रेसला वाटते. विजय यांचा करिष्मा आणि लोकप्रियता शिखरावर आहे. निकालानंतर राहुल गांधी आणि विजय हे एकमेकांच्या किती जवळ आहेत हेच दिसून आले.

पश्चिम बंगालमध्ये पराभवानंतरही ममता यांनी भाजपाच्या विरोधात आक्रमक भूमिका घेऊन लढा चालूच राहील, असे जाहीर केल्यामुळे राहुल गांधी यांनी ममता बॅनर्जींना सहमती दर्शवली आहे. निवडणुकीमध्येव्होटचोरीझाल्याचाआरोपत्यांनीकेलाआहे. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी कोलकता येथे जाऊन ममता यांना भेटून आपला पक्ष त्यांच्याबरोबर असेल, असे सांगितले आहे. पुढील वर्षी उत्तर प्रदेशमध्ये विधानसभा निवडणूक आहे. या राज्यातून काँग्रेसचे सहा आणि समाजवादी पक्षाचे ३७ खासदार लोकसभेत आहेत. पुढील वर्षी पंजाब, गुजरात, उत्तर प्रदेश या तीन प्रमुख राज्यांमध्ये निवडणुका आहेत. त्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडी जिवंत ठेवणे, काँग्रेसच्या दृष्टीने आवश्यक आहे. विजय यांच्या टीव्हीके पक्षाला समर्थन देताना संविधानावर विश्वास नसणाऱ्या जातीयवादी पक्षांना आघाडीबाहेर ठेवले जाईल, या अटीवर काँग्रेसने पाठिंबा दिला आहे. तामिळनाडूमध्ये गमावलेला जनाधार काँग्रेसला पुन्हा मिळवायचा आहे. विजय यांच्या पक्षाला दिलेले समर्थन आगामी लोकसभा, राज्यसभा आणि स्थानिक निवडणुकीमध्येही कायम राहील असे काँग्रेसने म्हटले आहे. त्यानंतर लगेचच द्रमुकने काँग्रेसशी फारकत घेतल्याचे जाहीर केले. लोकसभा अध्यक्षांना पत्र लिहून आपल्या खासदारांची आसन व्यवस्था काँग्रेसपासून दूर ठेवावी असे द्रमुकने कळवले आहे. तामिळनाडूमध्ये द्रमुक आणि काँग्रेस यांच्यात इंदिरा गांधीपासून चांगले संबंध होते. राहूल गांधी व स्टॅलिन हे सुध्दा एकमेकांना भाई म्हणत असत. पण काँग्रेसने स्वत:च्या फायद्यासाठी विजय यांच्या टीव्हीके पक्षाला समर्थन दिले, हा इंडिया आघाडीतील मित्रपक्षांचा विश्वासघात आहे, असे अनेकांना वाटते. इंडिया आघाडीमध्ये समन्वय असल्याचा लाभ प्रादेशिक पक्षांना होतो, पण सर्वाधिक लाभ काँग्रेसला होतो. असे असताना 'राज्यातही आम्ही आणि केंद्रातही आम्हीच' अशा पध्दतीने काँग्रेस मित्रपक्षांशी वागणार असेल तर मतविभाजनाचा लाभ भाजपाला होत राहणार.

**चर्चा आजची**

# 'लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण मात्र कोरडे...'

**संतोष राऊळ**

नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचतीसाठी देशवासीयांना आवाहन केले आहे. त्यात त्यांनी लोकप्रतिनिधींनी स्वतः उदाहरण घालून द्यावे, असे आवाहन केले आहे. त्यानंतर काही अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधी सायकल, बैलगाडी किंवा साध्या वाहनातून कार्यालयात येताना दिसू लागले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चक्क बुलेटवरून मंत्रालयात जाताना दिसले. तर, काही मंत्री पायपीट करत मंत्रालयात पोहोचले. त्यांच्यातील हे परिवर्तन पाहून सर्वसामान्य नागरिकांमध्ये कुतूहल निर्माण झाले होते. पण काहींनी याकडे फोटोसेशन किंवा देखावा म्हणून पाहिले. त्याचवेळी पंतप्रधान मोदींनी सार्वजनिक वाहतूकीने प्रवास करा, आवश्यक असेल तरच खासगी वाहनाने प्रवास करा, इलेक्ट्रिक गाड्यांचा वापर करा, प्रदेशवारी टाळा असे अनेक आवाहन नागरिकांना केले होते. मात्र, त्यांच्या या आवाहनाला त्यांच्यांच नेत्यांनी आणि प्रदेशवारी टाळा असे सांगणाऱ्या पंतप्रधानांनीच हरताळ फासली. त्यामुळे 'लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण मात्र कोरडे पाषाण' अशी चर्चा सर्वसामान्यांमधून होत आहे.

सध्या जगात युद्धाचे वारे वाहत आहेत. इराण, इस्त्राईल आणि अमेरिका यांच्यातील संबंध ताणले गेले आहेत. त्याचा परिणाम कच्च्या तेलावर होत आहे. त्यामुळे पेट्रोल, गॅस आणि खाद्य तेलाचा पुरवठा कमी प्रमाणात होत असल्याचे केंद्र शासनाकडून सांगण्यात येत आहे. तर, दुसरीकडे हेच केंद्र सरकार इंधनाचा साठा मुबलक असल्याचे देखील सांगत आहे. त्यांच्या या वक्तव्यांमुळे सर्वसामान्य जनता बुचकळ्यात पडली आहे. कच्च्या तेलाअभावी देशात इंधनाचा तुटवडा निर्माण झाल्याच्या अफवा देखील पसरवल्या गेल्या. त्यामुळे शेकडोंच्या संख्येने वाहनचालकांनी प्रत्येक पेट्रोल पंपावर एकाच वेळी गर्दी केली. एकाच वेळी मर्यादेपेक्षा जास्त वाहने आल्यामुळे वेळोवेळी पेट्रोल पंपावरील मर्यादित इंधनाचा साठा संपुष्टात येऊ लागला. त्यामुळे वाहनचालकांच्या मनांत आणखिनच भीती निर्माण झाली. त्यांनतर एलपीजी गॅस बाबतही अशाच अफवा पसरविण्यात आल्या. लोकांनी नोटबंदी नंतर भरउन्हात एलपीजी गॅससाठी मोठंमोठ्या रांगा लावल्या. यावेळी देखील एकाच वेळी शेकडो ग्राहक गॅस वितरकाकडे आल्याने तेथील मर्यादीत गॅस सिलिंडरचा साठा देखील संपुष्टात येत राहिला. त्यामुळे देशात गॅसचा देखील पुरवठा संपला असल्याच्या भीतीने नागरिकांनी दिवसभर रांगा लावायची सुरूवात केली. आणि आता त्यात भर म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेले आवाहन.

नुकतेच पंतप्रधान यांनी, इंधन बचतीचे आवाहन केले आहे. त्यांनी सार्वजनिक वाहतूकीने प्रवास करा, आवश्यक असेल तरच खासगी वाहनाने प्रवास करा, इलेक्ट्रिक गाड्यांचा वापर करा, प्रदेशवारी टाळा असे अनेक आवाहन नागरिकांना केले. त्यामुळे अनेकजण बुचकळ्यात पडले. आधीच राज्यात सार्वजनिक वाहतुकीची दयनिय अवस्था झालेली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना तर जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. तसेच, शहराठिकाणी देखील तिच परिस्थिती आहे. रेल्वे वाहतुक देखील दिवसेंदिवस धोकादायक होत चालली आहे. सकाळी कार्यलयीने वळेत आणि संध्याकाळी कार्यालयातुन सुटल्यावर रेल्वे प्रवाशांना मोठ्या संकटाना सामोरे जावे लागते. यावेळी रेल्वे स्थानकात एवढी प्रचंड गर्दी असते की, दिवसभर थकलेला कामगार रेल्वेत चढता चढता आवसान टाकतो. आपण धडधाकट घरी पोहोचू की नाही, याची देखील त्यांना शास्वती नसते. आणि प्रदेशवारी तर सोडाच, सांधं भारतात फिरणे देखील सर्वसामान्यांना आर्थिक भुर्दंड बसत आहे. तसेच, सार्वजनिक वाहनांतुन प्रवास करताना वेळेचाही अपव्यय होतो. त्याचबरोबर इलेक्ट्रिक वाहनांचा अवलंब करण्याचे आवाहन देखील पंतप्रधान मोदी यांनी केले आहे. परंतु, इलेक्ट्रिक वाहनांच्या किमती देखील गगनाला भिडल्या आहेत. सर्वसामान्यांना तेही शक्य नाही. आणि ज्यांनी नव्याने इंधनावर चालणाऱ्या गाड्या खरेदी केल्या आहेत त्यांचे काय? त्या विकुन अर्धेपैसे देखील मिळणार नाहीत. आणि पेट्रोल, डिझेलसह इतर जीवनावश्यक किंमतीत वाढ केल्याने सर्वसामान्य जनता मेटाकुटीला आली आहे. अशी परिस्थिती सध्या देशात आहे.

असे असताना पंतप्रधान कोणत्या आधारावर सर्वसामान्यांना इंधन बचतीचे आवाहन करत आहेत. एकीकडे ते आवाहन करतात आणि दुसरीकडे त्यांचेच नेते आवाहनावर हरताळ फासतात. काही नेत्यांच्या वाहनांत चाळीस एक गाड्यांचा ताफा असतो. काही नेते बसमधून फिरतात, मात्र त्यांच्या मागून अनेक वाहनांचा ताफा असतो. तसेच, देशातील काही मंत्र्यांनी, अधिकारी व सरकारी कर्मचाऱ्यांनी पंतप्रधान मोदींचे आवाहन पाळले आहे. काही सायकल घेऊन तर काही जण पायपीट करत कार्यालयापर्यंत पोहोचत आहेत. या सर्वांची घरे कार्यालयापासून काही अंतरावर असल्याने त्यांना ते शक्य आहे. मात्र, सर्वसामान्य जनेतेचे कामाचे ठिकाण जर ५ किमीपेक्षा जास्त अंतरावर असेल आणि सार्वजनिक वाहतुक देखील उपस्थित नसेल तर त्यांनी काय करावे, असा प्रश्न सर्वसामान्य जनता उपस्थित करत आहे.

नुकतीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परेदशवारीला सुरूवात केली. प्रवासादरम्यान, भल्या मोठ्या विमानात काही नेमकेच पंतप्रधानासोबत प्रवास करतात. तसेच, त्यांच्या विमानाच्या सुरक्षिततेसाठी आणखी एक विमान. त्यांनतर राज्याचे मुख्यमंत्री पीयुसी संपलेल्या बुलेटवरून मंत्रालयात पोहोचत आहेत. त्यांचेच काही नेते पाहणी दौऱ्यासाठी अनेक गाड्यांचा ताफा घेऊन फिरत आहेत. काही नेते तर सार्वजनिक बसमधून जाण्याचा आव आणत असून, त्यांच्या मागे अनेक गाड्यांचा ताफा असतो. त्यामुळे 'लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण मात्र कोरडे पाषाण' अशी चर्चा सर्वसामान्यांमधून होत आहे.

**लोकसंसद**

## पवित्र आणि फलदायी 'पुरुषोत्तम मास'!



हिंदू संस्कृतीनुसार अधिक मासाला विशेष महत्त्व असून १७ मे पासून अधिक मासाला सुरुवात झाली आहे. हा ज्येष्ठ अधिकमास १५ जून २०२६ पर्यंत असणार आहे. हिंदू पंचांगानुसार ३५४ दिवसांचे चांद्र वर्ष आणि ३६५ दिवसांचे सौर वर्ष यांच्यातील ११ दिवसांचा फरक भरून काढण्यासाठी दर तीन वर्षांनी अधिक मास येतो. या अधिक मासाला 'पुरुषोत्तम मास' असे म्हटले जाते आणि हा महिना आत्मशुद्धी, आध्यात्मिक उन्नतीसाठी आणि ईश्वरी कृपेच्या दृष्टिकोनातून अत्यंत पवित्र आणि फलदायी मानला जातो. भगवान श्रीविष्णूला समर्पित असल्यामुळे या महिन्यात केलेले जप, तप, पूजा पाठ आणि दानधर्म यांचे पुण्य अधिक लाभते अशी अध्यात्मिक धारणा आहे. या काळात व्रत, उपवास आणि भगवद्गीता इत्यादी धार्मिक ग्रंथांचे पारायण केल्याने मन:शांती लाभते. याला 'धोंड्याचा महिना' असेही म्हणतात. दुसरे म्हणजे या महिन्यात सूर्य कोणत्याही नवीन राशीत संक्रमण करत नाही. त्यामुळे या महिन्याला 'मलमास'ही म्हटले जाते. अधिक मास हा सांसारिक आणि भौतिक सुखांपेक्षा आध्यात्मिक साधनेसाठी मानला जातो. त्यामुळे विवाह, गृहप्रवेश, वास्तुशांती अशी शुभकार्ये सहसा केली जात नाहीत. यापुढील अधिकमास १६ मार्च ते १३ एप्रिल २०२९ दरम्यान येणार असून तो अधिक चैत्र मास असणार आहे. **– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**दिनविशेष**

# जागतिक संग्रहालय दिवस

जगभरात १८ मे हा दिवस जागतिक संग्रहालय दिवस म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. १९७७ सालापासून जगभरात हा दिवस साजरा केला जातो. दरवर्षी आंतरराष्ट्रीय संग्रहालय कौन्सिल यांच्यामार्फत जगभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन जागतिक संग्रहालय दिवसाच्या निमित्ताने केले जाते. गेल्या अनेक वर्षांपासून जगभरातील देशांचा या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून येत असतो. या कार्यक्रमात अनेक ऐतिहासिक तसेच विचित्र गोष्टींचे सुद्धा प्रदर्शन पाहायला मिळत असते. भारतात सुद्धा अनेक संग्रहालय आहेत परंतु त्यातील काही संग्रहालयांची आपल्याला माहिती सुद्धा नसते.भारताची आयटी राजधानी असलेल्या बँगलोर शहरात लेजेंड मोटरसायकल कॅफे संग्रहालय आहे. या संग्रहालयात २० पेक्षा अधिक विंटेज दुचाकी वाहने आजही चालू स्थितीत असलेले आपल्याला पाहायला मिळते. हे संग्रहालय दुचाकी वाहनाचे निस्सीम चाहते असणारे एस.प्रभू यांच्या आजपर्यंतच्या कलेक्शन मधून साकार झाले आहे. या संग्रहालयात १९२४ सालची दुचाकी पासून ते १९४२ च्या जेम्स एमएल व बीएसए एम२० सुद्धा बघायला मिळतात. गुजरात राज्य संक्रातीतील पतंग महोत्सवासाठी संपूर्ण जगात ओळखले जाते. त्याच गुजरात मधील अहमदाबाद शहरात पतंग संग्रहालय सुद्धा आहे. या पतंग संग्रहालयात १२५ पेक्षा अधिक अतिशय दुर्मिळ अश्या पतंग पाहायला मिळतात. या संग्रहालयाची स्थापना हि १९८६ साली करण्यात आली. या संग्रहालयाला पतंग प्रेमी श्री. भानूभाई शाह यांनी त्यांच्या कलेक्शन मधील सर्व पतंगी दान म्हणून दिल्या आहेत. वयाच्या २१ व्या वर्षांपासून त्यांनी या पतंगी जमा करण्यास सुरवात केली होती. पुरखौती मुक्तांगण हे खरतर संपूर्ण छत्तीसगड राज्याच्या संस्कृतीचे संग्रहालय आहे. या संग्रहालयात आपल्याला छत्तीसगड राज्यातील संपूर्ण संस्कृतीचे दर्शन होते. २००६ साली छत्तीसगडमधील रायपूर या ठिकाणी या संग्रहालयाचे मा.राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले होते.

बँगलोरमध्ये २०१० साली विज्ञानाच्या दृष्टीने अति महत्वाचे मानता येईल अश्या या मानवी मेंदूच्या संग्रहालयाची स्थापना करण्यात आली. या संग्रहालयात काचेच्या बरणीत जतन करून ठेवलेले ४०० पेक्षा जास्त मेंदू आपल्याला पाहायला मिळतात. आजार, मार लागून मेंदूवर परिणाम झालेले अनेक मेंदू या ठिकाणी अभ्यासाच्या हेतूने जतन करून ठेवण्यात आले आहेत. आसामची राजधानी असलेल्या गुवाहाटी शहराच्या अगदी जवळ मायोंग नावाचे छोटेसे शहर आहे. तुम्हाला जाणून आश्चर्य होईल कारण ही जागा त्याच्या काळ्या जादूच्या विद्येसाठी कुप्रसिद्ध आहे. आणि त्याहून अधिक आश्चर्याची बाब अशी कि याठिकाणी जगातील एकमेव काळ्या जादूच्या विद्येचे संग्रहालय सुद्धा आहे. या संग्रहालयात अनेक वस्तू ठेवण्यात आल्या आहेत ज्याचा प्राचीन लोकांनी काली जादू करण्यासाठी उपयोग केला होता. याठिकाणी असलेल्या लोकांकडून त्याचे प्रात्यक्षिक सुद्धा करून दाखविण्यात येते. भारताचे आर्थिक चक्र फिरवणाऱ्या रिजर्व बँक ऑफ इंडियाचे स्वतःचे अशे संग्रहालय असून या संग्रहालयात मोठ्या प्रमाणात जतन केलेल्या नाणे, चलनी नोटा या आपल्याला पाहायला मिळतात. तसेच या संग्रहालयात हस्ताक्षराचे सुद्धा संग्रहालय असून त्यात अनेक दिग्ज लोकांचे हस्ताक्षर आपल्याला पाहायला मिळतात.

आपल्या जगातील काही ठिकाणे संग्रहालयांपेक्षा अधिक शैक्षणिक आहेत. शेवटी, आपल्या पूर्वजांबद्दल इतक्या कथा सांगणाऱ्या वास्तविक इतिहासाचे इतके तुकडे पाहण्याची आशा आपण कुठे करू शकतो? प्रागैतिहासिक भाल्यापासून ते इजिप्शियन ममींपर्यंत, प्राचीन ग्रीक शिल्पांपासून मध्ययुगीन चिलखतांपर्यंत आणि पहिल्या रेडिओपासून ते विश्व युद्ध १ दरम्यान युद्धात वापरल्या गेलेल्या पहिल्या विमानांपर्यंत, संग्रहालयांमध्ये हे सर्व आहे. दुर्दैवाने, असे लाखो लोक आहेत ज्यांना संग्रहालयात थेट प्रवेश आहे ज्यांनी कधीही भेट दिली नाही.

# अणुस्कूरा घाटासाठी मास्टर प्लॅनची गरज

## दरडी, भूस्खलनामुळे प्रवास धोक्यात; कायमस्वरूपी वैज्ञानिक नियोजनाची मागणी

**| राजापूर | वृत्तसंस्था |**

रत्नागिरी जिल्ह्याला पश्चिम महाराष्ट्राशी जोडणारा शॉर्टकट म्हणून ओळखला जाणारा अणुस्कूरा घाटमार्ग गेल्या काही वर्षांपासून पावसाळ्यात दरडी कोसळणे, माती घसरणे आणि दगड रस्त्यावर येणे अशा घटनांमुळे धोकादायक बनत चालला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तात्पुरत्या उपाययोजना केल्या जात असल्या तरी त्या पुढील पावसाळ्यात निष्प्रभ ठरत असल्याने घाटरस्त्यासाठी कायमस्वरूपी मास्टर प्लॅनची मागणी जोर धरू लागली आहे.



सुमारे नऊ किलोमीटर लांबीचा अणुस्कूरा घाटमार्ग घाटमाथा आणि कोकण यांदरम्यान कमी वेळेत प्रवासासाठी वाहनचालकांकडून मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. त्यामुळे या मार्गावर वर्षभर वाहतुकीची वर्दळ असते. मात्र नागमोडी वळणे, उंच कडे, सैल दरडी आणि उभ्या दगडी कपारी यांमुळे हा मार्ग धोकादायक ठरत आहे.

गेल्या दोन-तीन वर्षांत अतिवृष्टीदरम्यान अनेकदा मोठ्या प्रमाणावर माती व दगड रस्त्यावर कोसळल्याने घाट काही काळ वाहतुकीसाठी बंद ठेवावा लागला होता. विशेषतः घाटातील पिकनिक स्पॉट परिसर सातत्याने भूस्खलनाच्या घटनांमुळे धोक्याचा पट्टा बनला असून पावसाळ्यात येथे वाहतूक विस्कळीत होते.

स्थानिकांच्या मते, दरवर्षी केल्या जाणाऱ्या तात्पुरत्या दुरुस्त्यांऐवजी घाटरस्त्याचे सखोल सर्वेक्षण करून धोकादायक दरडी, अरुंद वळणे, संभाव्य भूस्खलन क्षेत्रे आणि आवश्यक संरक्षण कठडे यांचे वैज्ञानिक नियोजन करणे आवश्यक आहे. त्यासाठी दीर्घकालीन मास्टर प्लॅन तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. दरम्यान, सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळ्यात आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवली असल्याचे सांगितले आहे.

> प्रवासाच्या दृष्टीने अणुस्कूरा घाट सुरक्षित राहावा यासाठी बांधकाम विभागाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. पावसाळ्यात घाटरस्त्यावर आपत्ती ओढवल्यास तातडीने प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवली आहे.
> – स्वप्नील बावधनकर, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१८ मे

१) श्री. दत्ताराम बाळू नाईक अलिबाग, १८-५-१९४४

२) श्री. सुनील गजानन पाटील अलिबाग, १८-५-१९५७

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै.लक्ष्मीबाई दामोदर पाटील स्मरणार्थ अलिबाग**

**विमल सॉ मिल उचेडे पेण**

**अभिजीत कारभारी, अलिबाग**

---

## सानवी पेटकरची इस्त्रो दौऱ्यासाठी निवड

**रत्नागिरी :** अभ्यंकर मूकबधिर विद्यालयाची विद्यार्थिनी सानवी श्रीकांत पेटकर हिची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. जिल्ह्यातील कर्णबधिर विद्यालयातील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांची रत्नागिरी जिल्हा परिषदेमार्फत इस्त्रोसाठीची विशेष परीक्षा घेण्यात आली. त्यामध्ये मूकबधिर विद्यालयातील सानवी पेटकर ही प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली. हा अभ्यास दौरा दिनांक १८ ते २३ मे या दरम्यान नियोजित करण्यात आला आहे. गतवर्षीही याच विद्यालयातील अनन्या रत्नदीप मूरकर हिची देखील इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली होती.

## कृषी दुकानांमधून भात बियाणी उपलब्ध

**साखरपा :** पावसाळा तोंडावर आला असताना ठीकठिकाणी कृषी सेवा दुकानांमधील विविध भात बियाणी विक्रीसाठी आली आहेत. शेतकऱ्यांनी बियाण्यांची खरेदी सुरू केली नसली तरी सदर बियाण्यांविषयी चौकशी सुरू केली आहे. कोकणात सर्वसाधारणपणे २५ मे च्या दरम्यान रोहिणी नक्षत्राला प्रारंभ होतो. हे नक्षत्र सुरू झाल्यावर पेरणीला प्रारंभ करतात. त्यासाठी आवश्यक ती विविध जातीची बियाणी दुकानदारांनी मोठ्या प्रमाणांवर खरेदी करून साठा करून ठेवला आहे.

---

## भाट्ये नारळ संशोधन केंद्राचे नुकसान

**| पालघर | वृत्तसंस्था |**

वादळी वाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पावसात रत्नागिरी-भाट्ये येथील नारळ संशोधन केंद्राचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामध्ये नारळाच्या विविध वाण संग्रहातील माड मोडून पडले असून मसाला पिके, सुपारी, केळी, कोकम या लागवडीचेही मोठ्याप्रमाणात नुकसान झाले. रोपवाटिकेमधील कलमे रोपांवरील शेडनेट उडून गेले असून कार्यालयाजवळील वीज खांब पडल्याने कार्यालय, प्रयोगशाळा येथील विद्युत पुरवठा काही काळ खंडीत झाला होता.

---

# पालघरमध्ये मतदार विशेष सखोल फेरतपासणी

## मोहीम राबविण्यासाठी जिल्हा सज्ज ; मतदार मॅपिंग ६५ टक्के पूर्ण

**| पालघर | वृत्तसंस्था |**

जिल्ह्यातील मतदार यादी शुद्धीकरण प्रक्रियेला वेग आला असून ६५ टक्के मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले आहे. पुढील महिन्यात राज्यभरात होणाऱ्या प्रत्यक्षात विशेष सखोल फेर तपासणी मोहिमेसाठी जिल्हा प्रशासकीय दृष्ट्या सज्ज असून ही प्रक्रिया सुरू होईपर्यंत मतदार मॅपिंगची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे.

जिल्ह्याच्या मतदार यादीत २३ लाख ८४ हजार ७७१ मतदारांची नोंद असून सहा विधानसभा क्षेत्र २२७४ मतदान केंद्र आहेत. प्रत्येक मतदान केंद्रासाठी असणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी मार्फत सन २००२ च्या मतदार यादीतील मतदारांशी मॅपिंग करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात आली असून अजून पर्यंत ६४.४९ टक्के मतदारांच्या नावांचे मॅपिंग झाल्याची दिसून आले आहे. उर्वरित ८.४७ लाख मतदारांच्या मॅपिंगसाठी बीएलओ प्रयत्नशील आहेत.लोकशाही व्यवस्थेला अधिक सक्षम आणि पारदर्शक बनवण्याच्या दिशेने पालघर जिल्ह्याने मोठी झेप घेतली असून, विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहिमेत मतदार मॅपिंग हा महत्त्वाचा टप्पा आहे.

डहाणू, विक्रमगड व पालघर या तीन विधानसभा क्षेत्रातील मतदार मॅपिंग ची टक्केवारी समाधानकारक असून इतर ठिकाणी कामानिमित्त परराज्यातून येणारी मंडळी परत गेल्याने, नोकरी सोडून गेल्याने अथवा मजुरी करणारे मतदार स्थलांतरित झाल्याने मॅपिंग प्रक्रियेत मर्यादा येत असल्याचे दिसून आले आहे.

प्रत्यक्षात ३० जून ते २९ जुलै दरम्यान होणाऱ्या विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहिमे दरम्यान सर्व मतदारांना दोन अर्ज देण्यात येणार असून त्यामध्ये मतदार यादीशी संबंधित तपशील व छायाचित्र सोबत देण्याचे आवाहन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमादरम्यान मतदारांच्या नमूद केलेल्या पट्ट्यावर अर्ज देण्यात येणार असून अशा प्रसंगी घरी नसणाऱ्या अथवा घर बंद असणाऱ्या मतदानाच्या घरामध्ये अर्ज टाकण्यात येतील असे स्पष्ट करण्यात आले आहे. मतदार यादीत समाविष्ट असणाऱ्या नागरिकांनी संबंधित बी एल ओ सोबत विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहिमे दरम्यान संपर्क ठेवण्याची सूचित करण्यात आले आहे.

---

# एपीएमसीत फास्टॅग प्रणालीमुळे उत्पन्न वाढणार

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरातील वाढती वाहन गर्दी, अनियंत्रित प्रवेश आणि महसूल गळती रोखण्यासाठी फास्टॅग आधारित प्रणाली पुन्हा एकदा चर्चेत आली असून, त्याबरोबरच क्यूआर कोड व बूम बॅरियर यंत्रणेच्या माध्यमातून संपूर्ण बाजार व्यवहारांचे डिजिटायझेशन करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

या प्रणालींच्या अंमलबजावणीमुळे वाहतूक व्यवस्थापन अधिक शिस्तबद्ध होण्याबरोबरच समितीच्या उत्पन्नात वाढ होण्याची अपेक्षा प्रशासनाने व्यक्त केली आहे.

### दक्षता पथकांची कारवाई अधिक तीव्र

बाजार आवारातील सेस वसुलीतील गळती, कमी बिलिंग आणि व्यवहारातील अपारदर्शकता रोखण्यासाठी एपीएमसीकडून दक्षता पथके अधिक सक्रिय झाली. बाजार आवारातून बाहेर जाणाऱ्या वाहनांची तसेच आत होणाऱ्या व्यवहारांची अचानक तपासणी करून महसूल गळतीचे प्रकार शोधले जात आहेत. पुढील टप्प्यात हीच व्यवस्था क्यूआर कोड, फास्टॅग आणि डिजिटल नोंदणीच्या माध्यमातून अधिक पारदर्शक करण्याचे प्रशासनाचे नियोजन आहे.

मुंबई एपीएमसी प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, बाजारात दररोज हजारो ट्रक, टेम्पो आणि पिकअप व्हॅनच्या माध्यमातून शेतमालाची आवक-जावक होत असते. मात्र, माल उतरवल्यानंतरही अनेक वाहने दीर्घकाळ बाजार आवारात उभी राहत असल्याने प्रवेशद्वारांपासून मुख्य रस्त्यांपर्यंत मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होते.

या पार्श्वभूमीवर टोलनाक्याच्या धर्तीवर फास्टॅग स्कॅनिंग प्रणाली लागू करण्यात येणार आहे. बाजारातील प्रत्येक प्रवेशद्वारावर वाहनांची डिजिटल नोंद, वेळेचे नियंत्रण आणि निश्चित कालावधीपेक्षा जास्त थांबल्यास स्वयंचलित दंड आकारणी अशी रचना असणार आहे.

या प्रणालीमुळे बाजारातील वाहनांची हालचाल रिअल टाइममध्ये ट्रॅक होणार असून, अनावश्यक पार्किंग आणि बेकायदा थांबे यावर नियंत्रण मिळण्याची अपेक्षा आहे. याचबरोबर महसूल वसुली अधिक पारदर्शक होऊन बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ होईल, असा प्रशासनाचा विश्वास आहे

## घटस्फोटीतांच्या सर्वेक्षणाची मागणी

**साखरपा :** विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या महिलांचे सर्वेक्षण व्हावे आणि त्यांच्या रोजगारासाठी संधी उपलब्ध व्हाव्यात अशी मागणी चक्रभेदी सोशल फाउंडेशनतर्फे करण्यात आली आहे. मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या महिला मोठ्या संख्येने आहेत. त्यांच्या रोजगाराचा प्रश्न मोठा आहे. तो सोडवायचा असेल तर अशा महिलांची निश्चित संख्या कळणे आवश्यक आहे. त्यासाठी अशा महिलांचे सर्वेक्षण होणे गरजेचे आहे.

---

## बियाणे, खतांच्या काळाबाजारावर कृषी खात्याचा असणार वॉच

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या विक्रीत काळाबाजार होऊ नये, यावर ङ्गवॉचफ ठेवण्यासाठी कृषी विभागामार्फत जिल्हा आणि तालुकास्तरावर भरारी पथके तैनात करण्यात आली आ-हेत. शेतकऱ्यांच्या तक्रारींची तपासणी १७ पथकांकडून केली जाणार आहे.

खरीप हंगामात पेरणीसाठी लागणारे बियाणे, खते मागणीप्रमाणे शेतकऱ्यांना उपलब्ध व्हावे आणि बियाणे, खते, कीटकनाशके आदी कृषी विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये यासाठी कृषी विभागामार्फत जिल्ह्यातील १५ तालुक्यांत प्रत्येक १ व जिल्हास्तरावर २ अशी १७ पथके स्थापन करण्यात आली आहेत.

## सुपारी- नारळ पिकाला हवे विम्याचे कवच

**| राजापूर | वृत्तसंस्था |**

हापूस आंबा आणि काजू पिकाला हवामान बदलाचा मोठा फटका बसत आहे. पर्याय म्हणून शेतकरी शाश्वत उत्पन्नासाठी सुपारी बागायतीकडे वळले होते; मात्र सुपारी आणि नारळ पिकाची स्थितीही बिकट झाली असून उत्पादनात निम्म्याहून अधिक घट झाली आहे. या पार्श्वभूमीवर, आंबा-काजू पिकाप्रमाणेच सुपारी आणि नारळ पिकालाही पीक विमा संरक्षण मिळावे, असा महत्त्वपूर्ण ठराव राजापूर पंचायत समितीच्या आढावा बैठकीत एकमताने मंजूर करण्यात आला.

सभापती नंदिनी कदम यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपसभापती अभिजीत गुरव यांच्या उपस्थितीत पंचायत समितीची आढावा बैठक झाली. सदस्य गुरव यांनी सुपारी-नारळ पिकालाही पीकविमा संरक्षण मिळाले, तर त्याचा परतावा बागायतदारांना मिळेल असा मुद्दा मांडला. या मुद्द्याला उपस्थितांनी दुजोरा देत विम्याचे कवच असण्याबाबत आपले मत मांडले.

> वर्षाकाठी दोनवेळा हमखास उत्पन्न मिळवून देणाऱ्या सुपारी बागायतींकडे शेतकरी वळत आहे. मात्र, सुपारीवरही बदलत्या वातावरणाचा परिणाम होत आहे. त्यामुळे बागायती विकसित करण्यासाठी बँकांकडून घेतलेल्या कर्जाचे हफ्ते फेडताना अडचणी येत आहेत. हे लक्षात घेऊन पिक विमा संरक्षण मिळावे.
> – मधुकर पाटील , शेतकरी.

---

**सागरी परिसंस्थेसाठी धोक्याची घंटा | परिसंस्था जतनाबाबत विचार गरजेचे**

# गणेशगुळे किनाऱ्यावर फिनलेस पॉरपॉईज मृतावस्थेत

**| रत्नागिरी | वृत्तसंस्था |**

गणेशगुळे समुद्रकिनारा येथे इंडो-पॅसिफिक फिनलेस पॉरपॉईज हा दुर्मिळ सागरी सस्तन प्राणी मृतावस्थेत आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. डॉल्फिनसदृश दिसणारा हा प्राणी समुद्राच्या लाटांसोबत किनाऱ्यावर वाहून आला होता. स्थानिक नागरिकांनी हा प्रकार पाहताच संबंधित यंत्रणांना माहिती दिली. मात्र, हा सागरी जीव नेमका कशामुळे मृत्यूमुखी पडला, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

हा प्राणी इंडो-पॅसिफिक फिनलेस पॉरपॉईज या नावाने ओळखला जातो. स्थानिक भाषेत त्याला अनेकदा 'डुकरा मासा' किंवा डॉल्फिन समजले जाते. मात्र, इतर डॉल्फिनप्रमाणे त्याला लांब चोच नसते. गोलाकार डोके आणि पाठीवर कोणताही पर किंवा कल्ला नसणे, ही त्याची खास वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळेच त्याला 'फिनलेस पॉरपॉईज' असे नाव देण्यात आले आहे. साधारण दीड ते दोन मीटर लांबीचा हा सागरी सस्तन प्राणी प्रामुख्याने मासे आणि लहान समुद्री जीवांवर उपजीविका करतो.



हा जीव मुख्यतः हिंदी महासागर आणि पश्चिम पॅसिफिक महासागर परिसरात आढळतो. किनारी भागातील उथळ समुद्र, खाड्या आणि खारफुटीच्या परिसरात त्याचे वास्तव्य असते. मात्र, गेल्या काही वर्षांत वाढते समुद्री प्रदूषण, प्लास्टिक कचरा, मासेमारीच्या जाळ्यात अडकणे आणि किनारी अधिवास नष्ट होणे यामुळे मोठे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळेच इंडो-पॅसिफिक फिनलेस पॉरपॉईज ही अत्यंत संवेदनशील आणि संरक्षित प्रजाती मानली जाते.

गणेशगुळे किनाऱ्यावर आढळलेला मृत प्राणी कुजण्यास सुरुवात झाल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेनंतर सागरी जैवविविधतेच्या संरक्षणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. तज्ज्ञांच्या मते, अशा दुर्मिळ सागरी प्राण्यांचा मृत्यू हा केवळ एका जीवाचा अंत नसून, तो सागरी परिसंस्थेतील बिघाडाचा इशारा असू शकतो.

संशोधक आणि अभ्यासक डॉ. स्वप्नजा मोहिते यांनी सांगितले की, इंडो-पॅसिफिक फिनलेस पॉरपॉईज हा किनारी परिसंस्थेच्या आरोग्याचा अत्यंत महत्त्वाचा सूचक मानला जातो. त्यांच्या उपस्थितीतून समुद्रातील जैवविविधता, खाड्या आणि खारफुटीच्या जंगलांची स्थिती समजते. प्रदूषण, अन्नसाखळीतील बदल आणि मानवी हस्तक्षेप यांचा परिणाम या प्राण्यांवर त्वरित दिसून येतो. त्यामुळे त्यांच्या संवर्धनासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. या घटनेमुळे सागरी जीवसंपत्तीचे संरक्षण, प्रदूषण नियंत्रण आणि किनारी परिसंस्थेच्या जतनाबाबत अधिक गंभीरपणे विचार करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

---

## निवडक



### शाहू महाराज जयंतीचे आयोजन

**माणगाव :** यंदा गांगवली येथे स्वराज्य विस्तारक छत्रपती शाहू महाराज यांची १७ आणि १८ मे रोजी ३४४ वी जयंती दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. गावात भगवे ध्वज, ढोल-ताशांचा गजर, प्रतिमापूजन, मिरवणूक आणि शिवकालीन इतिहासाचे स्मरण करणारे विविध कार्यक्रम, पालखी, मावळ्यांचे वंशज, शिवभक्त यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांमध्ये इतिहासाविषयी अभिमान निर्माण व्हावा आणि शाहू महाराजांच्या विचारांची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचावी, हा या उत्सवामागील मुख्य उद्देश आहे. शाहू महाराजांचे जीवन हे संकटांवर मात करून स्वराज्य अधिक बळकट करण्याचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांचे कार्य केवळ मराठा इतिहासापुरते मर्यादित नसून भारतीय राज्य कारभार, संघटनशक्ती आणि लोककल्याणकारी नेतृत्वाचा आदर्श मानले जाते. छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म माणगाव तालुक्यातील गांगवली येथील एका वाड्यात १८ मे १६८२ रोजी झाला. आता या वाड्यांचे रुपांतर भव्य स्मारकात करण्यात येत आहे. त्यासाठी मंत्री भरत गोगावले यांच्या माध्यमातून सरकारने ५० लाख रुपये अंदाजित खर्च मंजूर केला आहे. हे स्मारक अधिक आकर्षक होण्यासाठी सरकारने आणखी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. हे स्मारक पूर्ण झाल्यानंतर हजारो शिवभक्त येतील असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### सीम कार्ड कंपनीवर दावा दाखल

**अलिबाग :** डॉ. जयपाल पाटील यांचा जगप्रसिद्ध फोन क्रमांक सीम कार्ड कंपनीने बंद केल्याने अलिबागमधील प्रसिद्ध वकील ॲड. अजय उपाध्ये यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग रायगड अलिबाग यांच्याकडे ३२ लाख रुपयांचा दावा दाखल केला आहे. तक्रारदार डॉ. जयपाल परशुराम पाटील हे अलिबागचे कायम रहिवासी असून व्यवसायाने ज्येष्ठ पत्रकार आहेत. गेली अनेक वर्ष विविध वृत्तपत्राचा संपादक, उपसंपादक, वार्ताहर म्हणून ४० वर्ष काम केले व करीत आहेत. त्याचबरोबर आपत्ती व्यवस्थापनचे देशभरात कार्य केले असून आजतागायत करीत आहेत. त्यांच्या या कार्यामुळे समाजात मानाचे स्थान आहे. आपत्ती व्यवस्थापन तज्ञ असल्याने दैनंदिन कामासाठी इंटरनेट, व्हाट्सअप आणि फेसबुक या नवीन अत्याधुनिक समाध्यमांची आवश्यकता असते. यासाठी कंपनीचा ९६७३७२७२७७ याचा वापर करीत होते. या कार्यात महाराष्ट्र पोलीस, वकील, डॉक्टर परिचारिका,१०८/१०२ रुग्णवाहिका चालक व नागरिकांना क्रमांक तोंड पाठ होता. त्यामुळे त्यांचे सेवाभावी काम सुरळीत होत असे. १४ फेब्रुवारी रोजी रुपये ४८९.३० गुगलपेने पैसे देऊन रिचार्ज केला होता. खात्यामध्ये बॅलन्स असूनही कंपनीने सेवा बंद केली. त्यामुळे त्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होऊन त्यांना मानसिक त्रास झाला आहे. मोबाईलच्या बंद केलेल्या सेवेमुळे त्यांचा संपर्क तुटल्यामुळे आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमात अडचणी निर्माण होऊन पंधरा ते वीस कार्यक्रमाला उपस्थित राहता आले नाही व ते ज्येष्ठ नागरिक व अखिल भारतीय ज्येष्ठ पत्रकार संघाचे राष्ट्रीय सचिव असल्याने त्यांचा संपर्क तुटल्याने मानसिक त्रास सहन करावा लागला. कंपनीला गुगल पेद्वारे पैसे पोहोचल्याने ते कंपनीचे ग्राहक झाले त्यांना झालेल्या तसदीबद्दल नोटीस दिली होती. त्यांनी गुणवत्तापूर्वक व दर्जेदार सेवा न दिल्याने शारीरिक, आर्थिक व मानसिक त्रास नुकसानापोटी ३२ लाख रुपये द्यावेत म्हणून ग्राहक पंचायत मध्ये दावा दाखल केला.



### तालुकास्तरीय कृषी मेळाव्याला प्रतिसाद

**चणेरा :** जिल्ह्यातील काही तालुक्यांत कृषी मिळावे आयोजीत झाले, त्यातील पहिल्या पाच क्रमांकात रोहा तालुकास्तरीय कृषी मेळावा आज शेतकऱ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात होत असल्याचे समाधान आहे. काही दिवसांपूर्वी आम्ही कृषी विभागाचा आढावा घेतला, योजनांवर चर्चा केली. त्यात महिला व बाल विकास विभागाकडून ३ टक्के निधी महिला शेतकऱ्यांसाठी राखून ठेवत जिल्हा नियोजनाकडे वर्ग केला. निधीचा योग्य लाभ अहिल्यानगरमधील प्रगतशील महिला शेतकऱ्यांनी घेतला याचा मनस्वी आनंद आहे. असाच लाभ रायगड जिल्ह्यातील महिला शेतकऱ्यांनी घ्यावा. तसे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना करण्यात आल्यात असे सांगत आता रासायनिक खतांचा वापर कमी करणे गरजेचे आहे, शाश्वत, नैसर्गिक शेती करा, कृषी मेळावा उत्स्फूर्त प्रतिसादात झाले. हे खूपच कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन अदिती तटकरे यांनी केले. त्या रोहा येथे आयोजित कृषी मेळाव्यात बोलत होत्या. पंचायत समिती रोहा, तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय कृषी मेळावा कार्यक्रमात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, कृषी सभापती वैकुंठ पाटील, जिल्हा परिषदेच्या सभापती उर्वशी वाडकर, निधी जाधव, सुमित काते, सभापती विजया पाशिलकर, उपसभापती संजय मांडलूस्कर, अध्यक्ष विनोद पाशिलकर, गटनेते किसन मोरे, पंचायत समितीचे सदस्य व अधिकारी उपस्थित होते.




### जागतिक डेंग्यू दिवस साजरा

**नवीन पनवेल :** पनवेल तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र गव्हाण अंतर्गत उपकेंद्र ओवळे, कुंडेवहाळ येथे १६ मे रोजी जागतिक डेंग्यू दिवस साजरा करण्यात आला. यावेळी गावात प्रभात फेरी काढण्यात आली. तसेच पथनाट्य देखील करण्यात आले. त्यानंतर ग्रामस्थांना सभेमध्ये माहिती देण्यात आली. आणि गप्पी मासे सोडण्यात आले. कुंडेवहाळ गावातील लोकांना चौका चौकात गट सभा घेऊन डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजना बाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले. यावेळी विस्तार अधिकारी पंचायत समिती पनवेल, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, सर्व आरोग्य सेवक, आरोग्यसेविका, तेरणा हॉस्पिटल नर्सिंग विद्यार्थी, आशा सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# निवडक



## तुराडेमध्ये विकासकामांना मंजुरी

रसायनी : तुराडे ग्रामपंचायतीच्या वतीने तहकूब झालेली ग्रामसभा घेन्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विविध विषयावर चर्चा होऊन अनेक विकास कमांना मंजुरी देण्यात आली. तसेच सद्य परिस्थितीमध्ये गावात सुरेक्षेचे प्रश्न निर्माण होतं असते. चोरीचे प्रमाण वाढत चालले आहे, महिलांचे मुलींचा छेडछाड असो अशा प्रकरणात आळा बसविण्याच्यासाठी ग्रामपंचायतीच्या सीसीटीव्ही लावण्यात आले. त्याचे उद्‌घाटन सुरेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.१५ टक्के अनुदानातून तुराडे मुकुंदवाडी येथे सार्वजनिक कार्यक्रमासाठी स्वयंपाकाची भांडी वाटण्यात आली. तुराडे ग्रामस्थांना ग्रामनिधीमधून स्वयंपाकाची भांडी देण्यात आली. याच दिवशी लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल मोहपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायत येथे नेत्रचिकित्सा शिबीर घेण्यात आले. यावेळी ४४ रुग्णांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. यावेळी रुग्णांचे नेत्र तपासून त्यांना माफक दरामध्ये चष्मे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी सुरेश ठाकूर, सरपंच रंजना गायकवाड,उपसरपंच लिना ठाकूर, गणेश वर्तक, नाना माळी, वामन चव्हाण, मालती वाघमारे, रिया माळी, ग्रामपंचायत अधिकारी अस्मिता मोकल, प्रदीप माळी, विलास पाटील, विश्वनाथ गायकवाड, संतोष वाघमारे, मयूर ठाकूर आदी उपस्थित होते.



## संदेश पाटील यांना रायगडभूषण पुरस्कार

**भाकरवड :** सुतारपाडा गावचे संदेश रामचंद्र पाटील यांना नुकताच मेपल आयवी हॉटेल अलिबाग येथे कॅस्ट्रॉल ऑइल कंपनीच्या मार्फत दिला जाणारा मानाचा रायगड भूषण कॅस्ट्रॉल विजेता पुरस्कार २०२६ मोठ्या उत्साही वातावरणात पार पडला. या सोहळ्यासाठी प्रमुख मान्यवर म्हणून कॅस्ट्रोल कंपनीचे न्याहारीका शर्मा, पार्थ मंडल, मनोज पाटील, बालकृष्ण खारगावकर, अजिंक्य ढोबळे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी अलिबाग, माणगाव, रोहा, कोलाड, पेण, महाड अधिक ठिकाणाहून जवळ जवळ ३०० हून अधिक मान्यवर आले होते. संदेश रामचंद्र पाटील हे एका सुतारपाडा खेडेगावातील रहिवासी असून त्यांनी प्रथम सायकलवर नाक्या नाक्यावर जाऊन थ्री व्हीलर, फोर व्हीलर गाड्यांची माफक व योग्य दरात ग्रीसिंग करण्याचे काम चालू केले हे करीत असताना ते थांबले नाहीत त्यांनी वेगवेगळ्या ऑइल कंपन्यांची संपर्क साधून आपण धंद्यामध्ये उतरावे अशी त्यांची तीव्र इच्छा झाली परंतु गरिबी असल्यामुळे ते करणे त्यांना शक्य नव्हतं गरिबीवर मात करत त्यांनी कॅस्ट्रॉल, विडॉल, गर्ल्स, फॉलोलाईन, एचपी, भारत पेट्रोलियम, सेल आधी ऑइल कंपन्यांची संपर्क साधून छोटेखानी व्यवसाय चालू केला. त्यामध्ये उत्तुंग भरारी घेत आपला व्यवसाय अधिकाधिक वाढविला. कंपनीचा विश्वास संपादन करून त्यांना प्रथम रायगड डिस्प्ले पुरस्कार, रायगड टारगेट पुरस्कार व त्यानंतर कॅस्ट्रॉल रायगड भूषण विजेता पुरस्कार २०२६ हा मानाचा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संदेश पाटील यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल अनेक स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसत आहे.

## आदिवासी विद्यार्थिनीची गगनभरारी

**पाली :** आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या ग्लोबल स्कॉलरशिप प्रोग्रॅम अंतर्गत अपर आयुक्त आदिवासी विकास विभाग, ठाणे यांच्या अधिपत्याखालील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव अंतर्गत आदिवासी मुलींचे शासकीय वस्तीगृह, हडपसर, पुणे येथे शिक्षण घेत असलेली सपना राजेश वाघमारे हिची उच्च शिक्षणासाठी युनिव्हर्सिटी ऑफ तसेच क्वीन मेरी युनिव्हर्सिटी, यूके येथे निवड झाली आहे. सपना राजेश वाघमारे ही रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील कोलाड येथील रहिवासी असून ती कातकरी समाजातील अत्यंत दुर्गम भागातील विद्यार्थिनी आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि आर्थिक अडचणींवर मात करत भारतीय संविधाना मुळे तिने हे यश संपादन केले आहे.



मोलमजुरी करून आपल्या मुलीला शिक्षण देणाऱ्या पालकांसाठी तसेच संपूर्ण आदिवासी विकास विभागासाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. आपल्या मुलीने जागतिक स्तरावर शिक्षणासाठी झेप घेतल्याने पालकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई, गृहपाल अर्चना पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच एकलव्य फाउंडेशनमार्फत मिळालेल्या शैक्षणिक मार्गदर्शनामुळे सपनाने परदेशात उच्च शिक्षण घेण्याचा निर्धार केला आणि त्यात यश मिळविले. आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांसाठी सपना वाघमारे हिचे यश प्रेरणादायी ठरणार असून, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर मोठी स्वप्ने पूर्ण करू शकतात, हे तिने सिद्ध करून दाखविले आहे.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम** करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, हाऊसकीपर, रेस्टॉरंट कॅप्टन, किचन हेल्पर, ब्रेकफास्ट कुक, मेंटेनेंस बॉय इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **पिकवर ड्रायवर हवा आहे.** पगार : १८०००/- मो. ८००७८९३२३२, ८८०६६८३२३२
- **फर्निचर शोरूममध्ये सेल्स गर्ल/बॉय पाहिजे.** ठिकाण : झिराड, पात्रता- MBA अनुभव- ३-४ वर्षे सेल्सचा अनुभव, पगार-२५००० महिना + इन्सेटिव्ह. Contact- 9823585321
- **मांडवा जेट्टीजवळ लुमा रिसॉर्टमध्ये अकाऊंटट पाहिजेत.** शिक्षण- ग्रॅज्युएशन, संगणक नॉलेज, टॅली, एक्सेल. मो. ९१४६३८३२५२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# १ जूनपासून समुद्रात मासेमारीला ब्रेक

■ ६१ दिवस यंत्रचलित नौकांवर बंदी ■ नियमभंग केल्यास जप्तीची होणार कारवाई

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील सागरी मत्स्यसंपत्तीचे संवर्धन आणि मासळीच्या प्रजनन काळाचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने यंदाही पावसाळी मासेमारी बंदी लागू केली आहे. महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ अन्वये १ जून ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राज्याच्या क्षेत्रीय सागरी जलधी क्षेत्रात यंत्रचलित आणि यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारी करण्यास बंदी घालण्यात आली आहे. सलग ६१ दिवस लागू राहणाऱ्या या बंदीचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी केले आहे.



मत्स्यव्यवसाय विभागाने स्पष्ट केले की, पावसाळ्यात मासळीच्या विविध प्रजातींचा प्रजनन काळ सुरू असतो. या काळात मोठ्या प्रमाणावर यांत्रिक पद्धतीने मासेमारी झाल्यास मत्स्यसंपत्तीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्याच्या सागरी हद्दीत मासेमारी बंदी लागू करण्यात आली आहे. ही बंदी केवळ यंत्रचलित आणि यांत्रिक नौकांनाच लागू राहणार असून पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बिगर-यंत्रचालित नौकांना त्यातून सूट देण्यात आली आहे.

पावसाळी मासेमारी बंदीचे उल्लंघन करणाऱ्या मच्छिमारांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अधिनियम २०२१ अंतर्गत कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. कलम १४ नुसार मासेमारी करताना आढळलेल्या नौका, त्यावरील यंत्रसामुग्री, मासेमारी साहित्य तसेच नौकेत सापडलेली मासळी जप्त करण्यात येणार आहे. याशिवाय कलम १७ मधील तरतुदीनुसार संबंधितांवर दंडात्मक कारवाईही केली जाणार आहे.

### १ जूनपूर्वी बंदरात परतणे बंधनकारक

सध्या समुद्रात मासेमारीसाठी गेलेल्या सर्व यंत्रचलित आणि यांत्रिक नौकांनी १ जून २०२६ पूर्वी संबंधित मासेमारी बंदरात परतणे आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. तसेच बंदी कालावधीत म्हणजेच ३१ जुलैपर्यंत अशा नौकांना समुद्रात मासेमारीसाठी जाता येणार नाही. बंदी काळात राज्याच्या सागरी क्षेत्रात मासेमारी नौकांच्या अवागमनावरही निर्बंध राहणार आहेत.

### १२ सागरी मैलांपर्यंत बंदी लागू

किनाऱ्यापासून १२ सागरी मैलांपर्यंत ही बंदी लागू राहणार आहे. या क्षेत्रात कोणतीही यंत्रचलित किंवा यांत्रिक नौका मासेमारी करताना आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. १२ सागरी मैलांच्या पुढे खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या नौकांसाठी केंद्र शासनाचे स्वतंत्र धोरण आणि मार्गदर्शक सूचना लागू राहतील, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

**अपघात झाल्यास नुकसान भरपाई नाही**

बंदी काळात नियम मोडून समुद्रात मासेमारीस गेलेल्या यंत्रचलित अथवा यांत्रिक नौकेस अपघात झाल्यास शासनाकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत अथवा नुकसानभरपाई दिली जाणार नसल्याचेही मत्स्यव्यवसाय विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नौकामालक आणि मच्छीमारांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# यादव समाज दिशा देणारा घटक

■ अजय बिरवाटकर यांचे प्रतिपादन

■ हळदी-कुंकू समारंभ व शिष्यवृत्ती वितरण उत्साहात

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

भारतीय स्वातंत्र्यपूर्व काळात समाजातील पूर्वजांनी गवळी समाजाची संघटना उभी करून मुंबईतील दादर-नायगाव येथे महाराष्ट्र यादव चॅरिटी ट्रस्टची भव्य वास्तू उभारली ही समाजासाठी अभिमानाची बाब आहे. समाज स्तरावर वंचित मानला जाणारा यादव समाज संख्या कमी असला तरी आज इतर समाज घटकांना दिशा देणारा समाज म्हणून पुढे येत असल्याचे प्रतिपादन अजय बिरवाटकर यांनी केले.



महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट, म्हसळा शाखेचा २८ वा वर्धापन दिन सोहळा, हळदी-कुंकू समारंभ तसेच शिष्यवृत्ती व पारितोषिक वितरण कार्यक्रम घोणसे निवाचीवाडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ट्रस्टचे शिखर समिती अध्यक्ष अजय बिरवाटकर हे उपस्थित होते.

ट्रस्टने समाज हिताच्या विविध योजना प्रभावीपणे राबवून त्याचा योग्य विनियोग केल्यामुळे दोन वेळा राज्यपालांच्या हस्ते सन्मान प्राप्त झाल्याची माहिती त्यांनी दिली. पुढे सांगताना समाजाच्या प्रगतीसाठी तब्बल ५३ कोटी रुपये खर्चून सात मजली नवीन इमारत उभारण्याची संकल्पना मांडण्यात आली असून ती पूर्णत्वास नेण्यासाठी सर्व समाजबांधवांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

समाजातील अनिष्ट चालीरीती, अवाजवी खर्चिक कार्यक्रम यांना आळा घालण्याची गरज व्यक्त करताना माता-भगिनींचा सन्मान राखणे ही समाजाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात श्रीकृष्ण पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.

# रेवा शिक्षण संस्थेच्या १७ जागासांठी ३२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

**। रोहा । प्रतिनिधी ।**

रोहा एज्यूकेशनल अँड वेल्फेअर असोसिएशन या शिक्षण संस्थेच्या त्रैवार्षिक निवडणुका २५ मे रोजी होत असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या दिवशी एकही उमदवाराने आपला अर्ज मागे न घेतल्याने या संस्थेच्या १७ जागांसाठी तब्बल ३२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत.

या निवडणुकीत काही जुने तर काही नवीन चेहरेदेखील उभे आहेत. विशेष म्हणजे यंदा पॅनल नसल्याने बलाढ्य उमेदवारांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली आहे. आरिफ अधिकारी, मुनाफ कागदी, मुदस्सीर कर्जीकर, अ.करीम खतीब, जावेद खेडेकर, परवेज चोगले, सलीम चोगले, मुश्ताक चोगले, अमजद चोगले, सैफ झकेरिया, सज्जाद डबीर, तजम्मुल डबीर, म. रफिक डबीर, सिमाब पल्लवकर, असिफ पेडेकर, फरहान पेडेकर, फैसल पेडेकर, सर्फराज बंदरकर,अतिक बडे, म.अनिस मोर्बेकर, सय्यद मोर्बे कर, अ.अजीज महाडकर, तोसिफ येरूणकर, मुजम्मिल येरूणकर, उस्मान रोहेकर, अ.कादिर रोगे, अबरार शेटे, मुनव्वर शेटे, याकूब शेख, मजहर सिद्दिक, दिलावर हाफिज असे दिग्गज उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत.

# कर्जतमध्ये श्री शनेश्वर जयंती उत्साहात साजरी

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील श्री. शनी मंदिरात आज श्री शनेश्वर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पहाटे पासूनच धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे १३ वर्षांनंतर श्री शनी महाराज जयंती शनिवारी हा योग आल्याने असंख्य भाविकांनी श्री. शनी महाराजांचे दर्शन घेतले.

तेरा वर्षांपूर्वी म्हणजे ४ जून २०१३ रोजी श्री शनेश्वर जयंती शनिवारी आली होती. त्यानंतर तेरा वर्षांनी आज हा योग आला. सकाळी श्रीनिवास राव व जागृती राव यांच्या हस्ते होम हवन करण्यात आले. त्यानंतर पारायण झाले. गणेश सोनी यांच्या हस्ते महाआरती नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी माजी आमदार सुरेश लाड, भगवान भोईर, नगरसेवक प्रशांत पाटील, वैभव सुरावकर, रोहित ओसवाल, गणेश सोनी, प्रकाश जैन, राजन काळे, रजनी सुर्वे आदी उपस्थित होते.

## अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला

**नवीन पनवेल :** पनवेल शहर पोलिसांना एका इसमाचा मृतदेह सापडला. त्याचा उजवा डोळा बंद असून डावा डोळा बाहेर आलेला आहे. नाकातोंडातून फेस येत आहे. गळ्यात रुद्राक्ष माळ असून उजव्या हातात स्टीलचे कडे आहे. त्याने अंगात पांढरे आणि जांभळ्या रंगाचा शर्ट आणि कमरेला काळ्या रंगाचा बेल्ट आहे. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार यांच्याशी संपर्क साधावा.

# माथेरानसाठी पंधरा तास पाणी पंम्पिग सुरू

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

ऐन सुट्टयांच्या हंगामात पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे पर्यटनावर विपरीत परिणाम होऊ नये यासाठी स्वतः नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी नेरळ येथील कुंभे, जुमापट्टी आणि वॉटर पाईप याठिकाणी असणाऱ्या पंपिंग हाऊस वर भेट देऊन संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्याशी चर्चा करून कोणत्याही परिस्थितीत पंधरा तास पाणी पंम्पिंग करावे असे सूचित केल्यानंतर अखेर माथेरानला पंधरा तास पाणी पंपिंग सुरू झाल्यामुळे पाण्याचा प्रश्न जवळपास संपुष्टात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



यावेळी त्यांच्या सोबत माथेरान उबाठाचे अध्यक्ष कुलदीप जाधव, उपनगराध्यक्ष संतोष शेलार उपस्थित होते. घाटात अनेक ठिकाणी पाणी चोरीच्या घटना घडत आहेत परंतु संबंधित अधिकारी वर्गाने दुर्लक्ष केल्यामुळे माथेरानला कमी दाबाने पाणी पुरवठा व्हायचा काही ठिकाणी चंद्रकांत चौधरी यांनी चोरीचे कनेक्शन स्वतः काढून टाकले आहेत.

पावसाळ्यात नेरळ येथून पाणी पुरवठा केला जात नाही परंतु उन्हाळ्यात ऐन सुट्ट्यांच्या हंगामात पाण्याची कमतरता भासली होती त्यामुळे येथील शारलोट लेक मधून पाण्याचा उपसा करण्यात आला होता या लेकची पाण्याची पातळी सुध्दा खाली गेली आहे. त्यामुळे नेरळ उल्हास नदीतून हा वाढीव पाणीपुरवठा केला जात आहे.

# मुरुडमध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर संपन्न

■ नागरिकांनी घेतला विविध दाखले व योजनांचा लाभ

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड नगरपरिषदेच्या संतोष तवसाळकर सभागृहात श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान शिबीर उत्साहात संपन्न झाले.



सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन शिवप्रतिमेस पुष्पहार घालून दीप प्रज्वलन करुन तहसीलदार आदेश डफळ व नगरपरिषदचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव आणि उपअधीक्षक भूमी अभिलेख काळे साहेब, मुरुड नगरपरिषद चे उपाध्यक्ष वीरेंद्र भगत,माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर व नगरसेवक रुपेश रणदिवे, प्रमिला सुभाष माळी, पांडुरंग आरेकर, यास्मिन कादीरी, नगमाना खानजादे, नितीन आंबुर्ले, अंकिता गुरव, प्रीता चौलकर, शहर अध्यक्ष दर्शन काळेबेरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

प्रॉपर्टी कार्ड बाबत मुरुडचे उपअधीक्षक भूमी अभिलेख काळे साहेब यांनी माहिती दिली. सदर शिबिरामध्ये महसूल व नगरपरिषद विभागामार्फत विविध सेवा उत्पन्नाचे दाखले १७ ,मंजूर फेरफार १०, डिजिटल सातबारा ११४, ८ अ ६८ , दुय्यम रेशन कार्ड ९ , आधी दाखल्यांचे वितरण करण्यात आले. तसेच सदर शिबिरात कार्यक्रमाच्या अनुषंगाने नगरपरिषद हद्दीतील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी उपस्थित राहून नागरिकांचे नमुना सहा ९, सात ६२, आठ ३७ चे फॉर्म भरून घेतले व प्रोजेनी मॅपिंग करण्यात आले.

सदर शिबिरात संगायो ०४, पुरवठा रेशन कार्ड ०९, आधार कार्ड ०७, मोजणी विभाग २०, सेतू सुविधा ३७, नगरपरिषद असेसमेंट उतारे ०४, रहिवाशी दाखले १३, जन्म दाखले ६०, मृत्य दाखले ५२ आदी अर्ज प्राप्त झाले व सदर शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

## नारायण आंबवणे यांचे निधन

**नवीन पनवेल :** चौक येथील नारायण गणपत आंबवणे यांचे वयाच्या ८६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यावर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी १९ मे रोजी गुळसुंदे येथे होणार असून उत्तरकार्य २२ मे रोजी चौक येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातू असा मोठा परिवार आहे. नारायण आंबवणे ह चौक ग्रुप ग्रामपंचायतचे माजी सदस्य होते.

प्रवेश प्रक्रिया माहिती पुस्तिका संकेतस्थळावर उपलब्ध | आयटीआय प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर

# आयटीआयसाठी २१ जूनपासून होणार नोंदणी सुरु

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अकरावी प्रवेशापाठोपाठ आता औद्योगिक प्रशिक्षण संस्थाम धील (आयटीआय) प्रवेशाचे वेळापत्रकही व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने शुक्रवारी जाहीर केले. त्यानुसार २१ मेपासून सकाळी ११ वाजता प्रवेश अर्ज नोंदणी प्रक्रियेला सुरूवात होणार आहे. प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील माहिती पुस्तिका संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.




राज्यात १ हजार ४ आयटीआय आहेत. त्यात ४१८ सरकारी आणि ५८६ खासगी संस्था आहेत. सरकारी व खासगी संस्थांमध्ये मिळून राज्यभरामध्ये १ लाख ५७ हजार ६६४ जागा आहेत. या जागांमध्ये सरकारी संस्थांमध्ये ९७ हजार ८८ तर खासगी संस्थांमध्ये ६० हजार ५७६ आहेत. या जागांसाठी संचालनालयामार्फत २१ मेपासून प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. त्यानुसार https://admission.dvet.gov.in/ या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरता येणार आहे.

विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज भरणे, दुरुस्ती करणे, शुल्क भरणे तसेच मूळ कागदपत्रांची अर्ज स्विकृती केंद्रांत जाऊन तपासणी करून अर्ज निश्चित करण्याची प्रक्रिया २१ मे रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू होणार आहे. त्यानंतर पहिल्या फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्य सादर करण्याच्या प्रक्रियेला १ जून राजी सकाळी ११ वाजल्यापासून सुरुवात होणार आहे. आयटीआयमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी २१ मे पासून सकाळी १० ते ११ या वेळेत नि:शुल्क मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात येणार आहे.

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाद्वारे इयत्ता १० वीची गुणपत्रिका शाळांमार्फत वितरित करण्यात आल्यानंतर आयटीआय प्रवेशाचे सविस्तर वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार असल्याचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून जाहीर करण्यात आले. आयटीआय संस्था व संकेतस्तळावर प्रवेश प्रक्रियेचे जाहीर करण्यात येणारे वेळापत्रक ग्राह्य धरण्यात यावे, असेही संचालनालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

प्रवेश पध्दती, नियमावली, प्रवेश संकेतस्थळाबाबत तांत्रिक व अन्य काही शंका असल्यास नजिकच्या शासकीय वा खासगी आयटीआय संस्थेशी संपर्क साधावा अथवा संबंधित जिल्हा, प्रादेशिक कार्यालयाच्या मदत कक्षास प्रवेश संकेतस्थळावर देण्यात आलेल्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

### प्रवेशासाठी शुल्क

प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना १५० रुपये अर्ज शुल्क भरावे लागणार आहे. राखीव प्रवर्गासाठी १०० रुपये, राज्याबाहेरील विद्यार्थ्यांसाठी ३०० रुपये आणि अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांसाठी ५०० रुपये शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

# आता जिल्हास्तरावर पीसीओडी क्लिनिक




**। रायगड । प्रतिनिधी ।**

महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यभर पॉलीसिस्टिक ओव्हेरियन डिसीज क्लिनिक सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या पीसीओडी समस्येवर वेळेत निदान, उपचार आणि समुपदेशन उपलब्ध करून देण्यासाठी ही नवीन विशेष उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या सुविधेचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांनी यासंदर्भात सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना आदेश जारी केले आहेत. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील महिलांना तज्ज्ञ उपचार आणि मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.पीसीओडी ही महिलांमध्ये आढळणारी हार्मोनल समस्या असून, त्याचा परिणाम मासिक पाळीतील अनियमितता, वजन वाढ, वंध्यत्व, मानसिक ताण, त्वचेच्या समस्या तसेच इतर आरोग्यविषयक गुंतागुंतांवर होत असतो. विशेषतः किशोरवयीन व प्रजननक्षम वयोगटातील महिलांमध्ये या समस्येचे प्रमाण वाढत असल्याने राज्य शासनाने यावर लक्ष केंद्रित केले आहे.

राज्यातील सर्व जिल्हा रुग्णालये, सामान्य रुग्णालये, स्त्री रुग्णालये, १०० खाटांची उपजिल्हा रुग्णालये तसेच महापालिका रुग्णालयांमध्ये पीसीओडी क्लिनिक सुरू करण्यात आली आहेत. ही क्लिनिक दर बुधवारी ङ्कमेनोपॉज ओपीडीफ सोबत चालविण्यात येतील. .ज्या रुग्णालयांमध्ये नियमित स्त्रीरोगतज्ज्ञ उपलब्ध नसतील, त्या ठिकाणी राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नियुक्त स्त्रीरोगतज्ज्ञांची सेवा घेण्यात येणार आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृतीसाठी उपसंचालक, आरोग्यसेवा तसेच आयईसी विभाग यांच्यामार्फत विशेष समन्वय साधण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील लाभार्थी महिलांची माहिती, तपासणी, निदान व उपचार यांचा नियमित अहवाल शासनाकडे सादर करण्यात येणार आहे.

### क्लिनिकमध्ये उपलब्ध सेवा

- स्त्रीरोगतज्ज्ञांकडून तपासणी
- आवश्यक वैद्यकीय तपासण्या
- एकात्मिक पद्धतीने उपचार
- आरोग्यविषयक समुपदेशन
- आहार व जीवनशैली संदर्भातील मार्गदर्शन

# हार्बर रेल्वे मेगा ब्लॉकमुळे प्रवाशांचे हाल



**पनवेल :** रविवारी हार्बर रेल्वे मार्गावर घेण्यात आलेल्या मेगा ब्लॉकमुळे पनवेल ते वाशी दरम्यान प्रवास करणाऱ्या हजारो नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर हाल झाले. आधीच वाढलेल्या उकाड्यामुळे प्रवासी त्रस्त असताना रेल्वे सेवा विस्कळीत झाल्याने बसस्थानक व रिक्षा स्टँडवर प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. पनवेल एस.टी. डेपो समोरील बस स्टॉपवर सकाळपासूनच प्रवाशांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

अनेक नागरिकांना बस मिळवण्यासाठी तासन्तास उन्हात उभे राहावे लागले. दुसरीकडे रिक्षाचालकांनी संधी साधत पनवेल ते वाशी प्रवासासाठी मनमानी पद्धतीने १०० रुपयांपर्यंत भाडे आकारल्याच्या तक्रारी प्रवाशांनी व्यक्त केल्या. प्रवास करणाऱ्यांना याचा मोठा फटका बसला.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# रायगडावरील शिवसिंहासनाला झळाळी

## शिवराज्याभिषेक दिनापूर्वी काम होणार पूर्ण



**। रायगड । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ऐतिहासिक सिंहासन स्थळाच्या संवर्धनाचे काम भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाच्या मुंबई मंडळाकडून वेगाने सुरू असून, शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यापूर्वी ते पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ११ कोटी रुपयांच्या खर्चातून हे काम सुरू आहे. सिंहासनाच्या मूळ अधिष्ठानाचे अवशेष पर्यटकांना स्पष्टपणे पाहता यावेत यासाठी समोरील भागात पारदर्शी काच बसविण्यात येणार आहे. प्रकाशयोजनाही केली जाणार आहे. पुरातत्त्व सर्वेक्षण अधिकारी राजेश दिवेकर यांनी ही माहिती दिली.

रायगडावरील सिंहासन, राजसदर आणि राज्याभिषेकाशी संबंधित वास्तूंचे संवर्धन भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाकडून अनेक वर्षांपासून टप्प्याटप्प्याने सुरू आहे. १९५३–५४ मध्ये सिंहासन परिसर, राजसदर आणि नगारखान्याच्या दुरुस्तीचे पहिले मोठे काम करण्यात आले होते.

त्यावेळी मूळ वास्तूचे अवशेष जतन करत परिसराचे मजबुतीकरण करण्यात आले होते. कालांतराने प्रतिकूल हवामानामुळे सिंहासन परिसरातील सिमेंट, विटांचे बांधकाम आणि लोखंडी संरचना कमकुवत झाल्या. त्यामुळे विद्यमान बांधकाम विद्रूप दिसू लागल्याने संवर्धन मोहीम हाती घेतली आहे. २०१८ मध्ये राज्य शासनाकडून भारतीय पुरातत्त्व विभागाला ११ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता. त्यापैकी बहुतांश निधी खर्च झाला असून, काही कामे अंतिम टप्प्यात आहेत. रायगडावरील मनोरे, बाजारपेठ, होळीचा माळ, शिपायांची निवासस्थाने, राजदरबार, नगारखाना, राणीवसा, दारूकोठार आणि हत्तीखान्यातील वस्तुसंग्रहालयाच्या संवर्धनासाठी अतिरिक्त ३० कोटी रुपयांची मागणी केली आहे. निधी मंजुरीला विलंब होत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

# लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**नवीन पनवेल :** अल्पवयीन मुलीला लग्न करण्याचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी शुभम तुळशीराम मुकादम (रा. नारपोली) याच्या विरोधात १५ मे रोजी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

२० एप्रिल ते दोन मे या दरम्यान पीडित मुलगी ही अल्पवयीन असताना आरोपी शुभम तुळशीराम मुकादम याने तिच्यासोबत मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले आणि तिच्या घरी रात्रीच्या वेळी गप्पा मारण्याच्या बहाण्याने माझे तुझ्यावर प्रेम आहे, तुझे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर मी लग्न करणार आहे, असे बोलून तिला लग्नाचे आमिष दाखवले. तिचा विश्वास शुभम तुळशीराम मुकादम याने मिळवून तिच्यावर अत्याचार केला.

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, श्रीमती राजश्री राजाराम माळी व राहुल तुकाराम माळी रा. भिंगारी पोस्ट अजिवली तालुका पनवेल जिल्हा रायगड ४१०२०६ यांनी खालील वर्णनाची शेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सचिन रमाकांत मोडक व इतर रा. कळंब तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०१०१ यांस कडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे मिळकतीचे वर्णन

**मौजे- कळंब, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे. नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| ७ | १ | ०-८४-१०<br>पो.ख ०-०६-१०<br>एकुण क्षेत्र ०-९०-२० या पैकी<br>०-१६-०० लिहून देणार यांचा अविभक्त हिस्सा | ८.६२ |

सदरची मिळकत हि वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकत देण्याचा हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकतीमधील तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिल विकत देण्याचे ठरविले आहे तरी वर वर्णन केलेली मिळकत बाबत इतर दुसरे कोणाचा करारनामा, ताबाकब्जा, गहाण दान, बक्षीस वगैरे अथवा अन्य इतर कोणतेही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल साठेकरार/खरेदीखताचा करार पुर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे

अशिला तर्फे ॲडव्होकेट

दिनांक : १८/०५/२०२६

**ॲड. हिरामण जनार्दन गायकवाड**

ऑफिस पत्ता गाळा नं. १, गणेश अर्पा. युको बँक शेजारी, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड

८९७६३७५५७०

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**

**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालय**

काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड

दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा क्र. ११/मा. अभि./जाहीर नोटीस/ / सन २०२६ दिनांक :- १४/०५/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

सरस्वती कॉम्प्लेक्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सर्व्हे नं. ३३/०,३४/४-२,३४/५,३४/४/१,३४/४-१बी,३४/६,३४/७,मौजे-बांधिवली-आदिनाथनगर-शेलू स्टेशनजवळ, ता. कर्जत, जि. रायगड, यांनी १. मे आदिनाथ कन्स्ट्रक्शन तर्फे प्रो. प्रा., लक्ष्मीचंद छेगालालजी शंकलेशा व त्यांचे वारस, पत्ता- ३०१, यशोमती बिल्डींग, पद्मावती जैन सोसायटी जवळ, कल्याण, जि.ठाणे-४२१३०६ जागामालक, २. अनंता नामदेव मसणे, ३. तारामती प्रभाकर गायकर,४.दया रामदास घारे, ४. बाळाराम नामदेव मसणे, पत्ता- घर नं. ५३४, शेलू, नेरळ, ता. कर्जत, जि.रायगड- ४१०१०१ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

**गाव बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक व उपविभाग - ३४/४/अ, क्षेत्र ५१०० चौ.मी.**

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २८/०५/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग

दिनांक- १४/०५/२०२६

सही/-

**तनवीर संपतराव पाटील**

सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक

सहकारी संस्था, रायगड अलिबाग

### महाराष्ट्र शासन

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड अलिबाग यांचे कार्यालय**

काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळमजला, महर्षी कर्वे, अलिबाग जि. रायगड

दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०१३ ई-मेल ddr_rgd@rediffmail.com

जा.क्र. जिउनि/गृह/मोफा क्र. ११/मा. अभि./जाहीर नोटीस/ / सन २०२६ दिनांक :- १३/०५/२०२६

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बाबत) जाहीर नोटीस**

मिडास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. दहिवली, ता. कर्जत, जि. रायगड यांनी विकासक व जागामालक, मिडास कन्स्ट्रक्शन तर्फे पार्टनर, १. श्री शमशुद्दिन अ. शेख, पत्ता- छोटू टेरेस, ई/१४, चौथा मजला, एन.ए. सावंत मार्ग, कुलाबा, मुंबई- ४०০००५ २. श्री आर.पी. गोयल, पत्ता- शॉप क्र. २, रा. शिवम अपार्टमेंट, कचेरी रोड, कर्जत ता. कर्जत, जि.रायगड- ४१०२०१ यांचे विरुद्ध महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन**

दहिवली तर्फे नीड, ता. कर्जत, जि. रायगड येथील नगर भूमापन क्रमांक - २०१, क्षेत्र ७१९.२० चौ.मी., नगर भूमापन क्रमांक - २०२, क्षेत्र १५.१० चौ. मी., नगर भूमापन क्रमांक - २०३, क्षेत्र १२४.६० चौ.मी. असे एकूण क्षेत्र १२३८.२० चौ.मी.

अर्जदाराचे अर्जाबाबत प्रतिवादी यांना नोटीस पाठविण्यांत येवून सदरची नोटीस त्यांना प्राप्त झालेली आहे. तरीही प्रतिवादी यांचेवतीने किंवा ते स्वतः सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. सबब अर्जदाराने जाहीर पेपर नोटीस मागणी केली आहे. गैरअर्जदाराचे म्हणणे दाखल करणेसाठी अंतिम संधी देण्यांत येत असून त्यांनी वरील मिळकती बाबत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी प्रस्तावित कार्यवाहीबाबत त्यांचे म्हणणे दिनांक २८/०५/२०२६ रोजी दुपारी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग

दिनांक- १४/०५/२०२६

सही/-

**तनवीर संपतराव पाटील**

सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक

सहकारी संस्था, रायगड अलिबाग

### खोपोली नगरपरिषद

**खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पिनकोड नं. ४१० २०३**

**फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११**

E mail ID :- cokmckhopoli@gmail.com

जा.क्र. केएमसी/एसके/८०४ दिनांक १५/०५/२०२६

**जाहीर सूचना**

खोपोली नगरपरिषदेमार्फत खालील वार्षिक कामाकरीता दर निश्चित करावयाचे आहे.

१) खोपोली नगरपरिषद कार्यालयातील कर्मचारी गणवेश खरेदी करणे.
२) खोपोली नगरपरिषदेच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी करणे.
३) खोपोली नगरपरिषदेच्या शालेय विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य (दप्तर) पुरविणे.
४) खोपोली नगरपरिषद कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी पावसाळी साधने खरेदी करणे.
५) खोपोली नगरपरिषद कार्यालयातील विविध विभागांसाठी बिल्चिंग पावडर व तुरटी खरेदी करणे.
६) खोपोली नगरपरिषद कार्यालयातील आरोग्य विभागासाठी आरोग्य जंतुनाशके व साहित्य पुरविणे.

सदर कामाकरीता दरपत्रक नमुना भांडार विभागामध्ये दि. १८/०५/२०२६ ते २५/०५/२०२६ कार्यालयीन वेळेत विनामुल्य मिळेल. सदरच्या दरपत्रकाच्या नमुन्यानुसार संबंधित कंत्राटदार यांनी फर्मच्या लेटरहेडवर दर देऊन बंद लिफाफ्यामध्ये मा. मुख्याधिकारी खोपोली नगरपरिषद यांचे नावे दि. २५/०५/२०२६ दुपारील ०३.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात आवक विभागात जमा करावेत. सदर दरपत्रक हे फक्त दर निश्चित करणे कामी मागविण्यात येत असल्याने दरपत्रक सादर करणारे संबंधित कंत्राटदार यांना कोणताही विशेष अधिकार असणार नाही किंवा दरपत्रकानुसार हक्क सांगता येणार नाही. खोपोली नगरपरिषदेकडून सदर प्रस्तावित कामाचे दर निश्चित झालेनंतर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात येईल.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| **भांडार पर्यवेक्षक** | **अंतर्गत लेखापरीक्षक** | **लेखापाल** |
| **खोपोली नगरपरिषद** | **खोपोली नगरपरिषद** | **खोपोली नगरपरिषद** |

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

रायगड विभाग, पेण.

**निविदा सुचना क्रमांक ०२ सन २०२६-२७**

विभागीय अभियंता म.रा.मा.प.महामंडळ रायगड विभाग पेण हे कोणत्याही शासकीय संस्थेचे,उदा. सार्वजनिक बांधकाम, म्हाडा इत्यादी यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदारांकडून अथवा अ-नोंदणीकृत परंतू स्थापत्य कामांचा अनूभव असलेल्या ठेकेदारकडून मोहोरबंद निविदा मागवित आहेत. तसेच स्थापत्य कामांचा खुलासेवार तपशील व निविदा सूचना कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

निविदा सादर करताना पुढील कागद पत्रे आवश्यक आहेत. ः१. आयकर प्रमाणपत्र २. सॉल्व्हंसी नोंदणी प्रमाणपत्र ३. पॅन कार्ड ४. मागील किमान तीन वर्षामध्ये केलेल्या कामाचें कार्यादेश व कामपूर्णत्वाचा दाखला / अनुभवाचे दाखले ५. आवश्यक यंत्र सामग्री तपशिल व मशिनरी बाबतचे दाखले ६.जी.एस.टी. नोंदणी दाखला ७. कामगार विमा दाखला (सर्व कागदपत्रांच्या छायांकीत व मुळ प्रती सादर करणे आवश्यक आहे.)

कामांचा तपशिल खालील प्रमाणे ः

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची निविदा रक्कम जी.एस.टी विरहीत | कामाची अनामत रक्कम १ टक्केप्रमाणे | सुरक्षाठेवीची रक्कम ४ टक्केप्रमाणे | को-या निविदा संचाची रक्कम जीएसटीसह |
|---|---|---|---|---|---|
| १ | रा.प महाड आगारातील पार्कींग क्षेत्राचे काही भागास पेवींग ब्लॉक बसविणे बाबत | ८,२५,१६५.१२ | ८२५२.०० | ३३००७.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| २ | रा.प अलिबाग बसस्थानकावरील पत्र्याची दुरुस्ती करणे बाबत | ४,१२,१७०.७२ | ४१२२.०० | १६४८७.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ३ | रा.प अलिबाग आगारातील पाणीपूरवठा लाईन बसविणे बाबत | २,४२,८३१.६८ | २४२९.०० | ९७१४.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |
| ४ | रा.प मुरूड आगारामध्ये मार्गतपासणी पथका करीता इमारतीच्या टेरेस वर नविन रूमचे बांधकाम करणे करीता | ८,४२,४४४.०० | ८४२५.०० | ३३६९८.०० | ५००+९०=५९०/- (१८%GST) सह |

क) कोरे निविदा संच मिळण्याचा कालावधीः-

कोरी निविदा पत्रिका देण्याची तारिख - दि.१८.०५.२०२६ ते २८.०५.२०२६ पर्यंत सुटया सोडून सोमवार ते शुक्रवार दुपारी १४.०० वा पर्यंत व शनिवार दु.१२.०० वाजेपर्यंत

निविदा सादर शेवट ची तारीख- दि. २८.०५.२०२६ वेळ -१५:०० वा. पर्यंत

निविदा पत्रिका उघडण्याची तारीख - दि. २८.०५.२०२६ वेळ -१५:०० वा. पर्यंत (शक्य असल्यास)

कामपुर्ण करण्याची मुदत- १ ते ४ कामाकरीता ६० दिवस

टीप ः-१. कोणतीही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महामंडळाने आपल्याकडे राखुन ठेवला आहे.

क्र.राप/राय/विनि/विअ/निविदा/
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय
रा.प रायगड विभाग पेण

विभागिय अभियंता
राज्य परिवहन रायगड विभाग

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत विद्यमान मालक सौ. राखी शशिधर राज्याध्यक्ष व श्री. शशिधर यशवंत राज्याध्यक्ष, यांची खुद्द मालकीची ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकत म्हणजेच मौजे कामत आळी मधील सिद्धीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था ता. अलिबाग जि. रायगड यातील वर्णनाची मिळकत आमचे अशिलांनी यांचे कडून खरेदी घेणेचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| गाव | मालमत्ता क्र. | सदनिका क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| मौजे अलिबाग, कामत आळी मधील सिद्धीविनायक सहकारी गृहनिर्माण संस्था | ALB000001701 Z1BHA001703 1434D विंग | डी विंग अप्पर दुसरा मजला, सदनिका नं. १० | ५४६ चौ. फुट बिल्टअप |

तरी वरील सदनिका मिळकतीबाबत कोणाचाही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मुत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुळअखत्यार पत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासुन १५ (पंधरा) दिवसाच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरची सदनिका निर्वेध आहे असे गृहित धरून सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

अलिबाग

ता. १६/०५/२०२६

खरेदीदारातर्फे वकील

**ॲड. मानसी संतोष म्हात्रे**

ॲडव्होकेट

देवगिरी, कामतआळी

अलिबाग, जि. रायगड

(मोबा.क्र. ९४२११५९१०९)

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय

**(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)**

ज.म. र अर्ज ४७९/२०२६

जाहिर नोटीस

प्रति,

श्री. हिदायतुल्ला अहमद कासकर,
रा. नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड, — अर्जदार

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. ०७/०८/१९६१ रोजी मौजे नांदगाव, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव, यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. ०७/०८/१९६१ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः १९-०५-२०२६ किंवा वकीला मार्फत मे. न्यायालयांत दिनांक २०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कळावे,

सही/-

**(आदेश डफळ)**

तहसिलदार मुरुड-जंजिरा

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे बोरगांव, ता. पेण, जि.रायगड येथील सामाईक मालकीची शेत जमीन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमीन मिळकतीचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास सामाईक मालकीच्या शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदरच्या सामाईक शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु. पै.) |
|---|---|---|---|
| बोरगांव | २११/३ | ०.३५.२०<br>पो.ख. ०.०३.४०<br>एकूण ०.३८.६० | २.३२ |

**वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमीन मिळकतीचे संपूर्ण क्षेत्र म्हणजेच ०.३८.६० हे.आर.चौ.मी. (३८.६० गुंठे) क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.**

वरील वर्णनाची सामाईक मालकीची शेत जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या सामाईक शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू सामाईक मालकीची शेत जमीन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरील सामाईक मालकी असलेल्या शेत जमीन मिळकतीच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू सामाईक मालकीच्या शेत जमीन मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदरच्या वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड

दिनांक १८/०५/२०२६

अशिलांचे वकील

**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**

ऑफिस :- ''वैरागी व्हिला'',

पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,

चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.

मो.नं. ९८८१६७१४२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली मौजे आधारणे, ता. पेण, जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत ही खरेदी करण्याबाबत आमचे अशिल सौ. नंदिनी नरेश वाघेला पाटील उर्फ नंदिनी जनार्दन पाटील, रा. फ्लॅट नं. ११०६, अरूणोदय हेरिटेज, जेकेडब्ल्यू संके ईएमपी सीएचएस, भांडूप वेस्ट, मुंबई ४०००७८ यांच्यासोबत सदर शेत जमीन मिळकतीचा व्यवहार रजि. साठेखताने ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास शेत जमीन मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यासदरी नांवे असलेले विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे. सदर शेत जमीन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

**शेत जमीन मिळकतीचे वर्णन -**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकारणी (रु. पै.) |
|---|---|---|---|
| आधारणे | २९/ह/१ | ०.७८.००<br>पो.ख. ०.०९.००<br>एकूण ०.८७.०० | १८.७१ |

**वरील शेत जमीन मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी शेत जमीन मिळकतीचे मालक यांच्या मालकीचे असलेले क्षेत्र ०.५१.०० हे.आर.चौ.मी., पोट खराबा क्षेत्र ०.०६.०० हे.आर.चौ.मी. असे एकूण क्षेत्र ०.५७.०० हे.आर.चौ.मी. यापैकी ०.३०.०० हे.आर.चौ.मी. (३० गुंठे) क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.**

वरील वर्णनाची शेत जमीन मिळकत ही पूर्णतः निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला शेत जमीन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू शेत जमीन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ, वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू शेत जमीन मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येईल व आमचे अशिल हे विद्यमान मालकांसोबत वरील शेत जमीन मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी नमुद क्षेत्राच्या खरेदी व्यवहाराबाबत सुरू असलेली बोलणी पूर्ण करून सदरहू शेत जमीन मिळकतीच्या एकूण क्षेत्रापैकी वरीलप्रमाणे नमुद केलेल्या शेत जमीन क्षेत्राचा व्यवहार पूर्ण करतील. तसेच वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

पेण- रायगड

दिनांक १८/०५/२०२६

खरेदीदारांचे वकील

**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**

ऑफिस :- 'वैरागी व्हिला',

पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,

चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.

मो.नं. ९८८१६७१४२४

# निवडक

## एमआयच्या मोठ्या पर्वाचा शेवट



**मुंबई :** मुंबई इंडियन्सकडून एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. मुंबई इंडियन्सच्या इतिहासातील एका मोठ्या पर्वाचा आता शेवट झाला आहे. भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू रॉबिन सिंगने मुंबई इंडियन्स सोडण्याची घोषणा केली आहे. रॉबिन सिंगने शुक्रवारी (दि.१५) पुष्टी केली की, तो मुंबई इंडियन्स आणि परदेशी 'एमआय एमिरेट्स' या दोन्ही संघांसोबतचा आपला प्रवास थांबवत आहे. त्यांच्या या निर्णयामुळे फ्रँचायझी क्रिकेटमधील सपोर्ट स्टाफ म्हणून असलेला त्याचा मोठा प्रवासही संपला आहे. रॉबिन २०१०मध्ये मुंबई इंडियन्समध्ये सामील झाला आणि फ्रँचायझीच्या सर्वात यशस्वी काळात पडद्यामागील एक महत्त्वाची व्यक्ती बनला. तो संघाच्या पाचही आयपीएल विजेतेपद मोहिमांचा भाग होता. तसेच, चॅम्पियन्स लीग टी-२० मधील विजयांमध्येही त्याने महत्त्वाचे योगदान दिले. जरी आयपीएल २०२२ मध्ये मुंबईच्या आयपीएल युनिटमधील त्याची थेट भूमिका संपली होती, तरी रॉबिन मुंबई इंडियन्सच्या मोठ्या नेटवर्कशी जोडलेला राहिला. त्याने २०२३ मध्ये पहिल्या आंतरराष्ट्रीय लीग टी-२० हंगामादरम्यान एमआय एमिरेट्सचा जनरल मॅनेजर म्हणून काम पाहिले आणि नंतर २०२४ मध्ये त्याला फ्रँचायझीच्या प्रमुखपदी बढती देण्यात आली. त्याच्या जाण्याने फ्रँचायझीमधील एका महत्त्वपूर्ण प्रशिक्षण पर्वाचा शेवट झाला आहे, जिथे त्याने अनेक विजेतेपद मिळवणाऱ्या संघासोबत काम पाहिले.

## श्रेयस अय्यरचे खास शतक

**धर्मशाला :** आयपीएल स्पर्धेतील ६१ वा सामना रविवारी (दि.१७) पंजाब किंगस विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघात धरमशाला येथे पार पडला. प्लेऑफच्या दृष्टीने दोन्ही संघांसाठी हा महत्त्वाचा सामना होता. यासोबतच हा सामना पंजाब किंग्सचा कर्णधार श्रेयस अय्यरसाठी खास ठरला. त्याने या सामन्यात नेतृत्व करताना एमएस धोनी, रोहित शर्मा, विराट कोहली यांच्या पंक्तीत स्थान मिळवले आहे. श्रेयस गेल्यावर्षीपासून आयपीएलमध्ये पंजाब किंग्सचे नेतृत्व करत आहे. तसेच, तो आयपीएलमध्ये २०१८ पासून विविध संघांच्या कर्णधाराच्या भूमिकेत पाहायला मिळाला आहे. बंगळुरूविरुद्ध रविवारी पार पडलेला सामना त्याचा कर्णधार म्हणून आयपीएलमधील १०० वा सामना ठरला. असे करणारा तो फक्त ५वा खेळाडू ठरला आहे. त्याच्याआधी एमएस धोनी, रोहित शर्मा, विराट कोहली आणि गौतम गंभीर या चौघांनीच १०० हून अधिक सामन्यात नेतृत्व केले आहे. त्यातील केवळ धोनीने २००हून अधिक सामन्यांत नेतृत्व केले आहे. श्रेयसने पंजाब किंग्सच्या आधी २०१८ मध्ये सर्वात पहिल्यांदा दिल्ली कॅपिटल्सचे नेतृत्वपद सांभाळले होते. त्याने २०२० पर्यंत ही जबाबदारी सांभाळली. त्यानंतर २०२२ ते २०२४ दरम्यान तो कोलकाता नाईट रायडर्सचा कर्णधार होता. त्याच्या नेतृत्वात कोलकाताने २०२४ मध्ये आयपीएल चषकही जिंकले. तसेच, त्याच्या नेतृत्वात २०२० मध्ये दिल्ली कॅपिटल्स, तर २०२५ मध्ये पंजाब किंग्स उपविजेते ठरले होते. त्यामुळे तो तीन संघांचे अंतिम सामन्यात नेतृत्व करणारा एकमेव कर्णधारही ठरला आहे.

## आयपीएचे वेळापत्रक बदलणार?

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२६ चा हंगाम दि.२८ मार्चपासून सुरू झाला असून, आतापर्यंत सर्व संघांनी विमान आणि रस्तेमार्गाने लाखो किलोमीटरचा प्रवास केला आहे. विविध शहरांमध्ये सामने आयोजित केल्यामुळे हा प्रवास अपरिहार्य मानला जात असला, तरी आता अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर परिस्थिती बदलताना दिसत आहे. अशा परिस्थितीत आयपीएल दरम्यान होणाऱ्या सततच्या हवाई प्रवासामुळे भारत सरकारवर अतिरिक्त ताण पडू शकतो, अशी चिंता व्यक्त करण्यात आली आहे. याच पार्श्वभूमीवर देशातील व्यापारी आणि उद्योजकांच्या प्रमुख संघटनांपैकी एक असलेल्या व्यापार आणि उद्योग मंडळचे चेअरमन ब्रिजेश गोयल यांनी केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांना पत्र लिहून आयपीएलच्या उर्वरित सामन्यांचे वेळापत्रक बदलण्याची मागणी केली आहे. हवाई प्रवास कमी करण्यासाठी उरलेले सामने मर्यादित मैदानांवर आयोजित करावेत, अशी त्यांची भूमिका आहे. ब्रिजेश गोयल यांनी पत्रात म्हटले आहे की, कोरोना काळातही मर्यादित मैदानांवर आयपीएलचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. त्यामुळे उरलेले सामने काही ठरावीक मैदानांवर आणि प्रेक्षकांविना घेण्यात यावेत. त्यांच्या मते, एका सामन्यासाठी सरासरी ५० हजार प्रेक्षक उपस्थित राहतात. त्यामुळे वाहनांमधून हजारो लिटर पेट्रोल-डिझेल खर्च होते. प्रेक्षकांविना सामने घेतल्यास या इंधनाची मोठ्या प्रमाणात बचत होऊ शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार देशभरात सरकारी यंत्रणा, अधिकारी आणि सामान्य नागरिक अनावश्यक खर्च टाळण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा वेळी आयपीएल सारख्या मोठ्या स्पर्धेतही इंधन बचतीसाठी उपाययोजना होणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

# गुजरातचा विजयरथ कोलकाताने रोखला

- जीटीचा २९ धावांनी पराभव
- पहिल्या स्थानावर राहण्याचे स्वप्न भंगले





| कोलकाता | वृत्तसंस्था |

आयपीएल स्पर्धेतील ६०व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने घरच्या मैदानात गुजरात टायटन्सला २९ धावांनी पराभवाचा मोठा धक्का दिला. या सामन्यात कोलकाताने २४८ धावांचे लक्ष्य गुजरातसमोर ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना गुजरातला २१८ धावाच करता आल्या. गुजरातने गेल्या ५ सामन्यांत सलग विजय मिळवले होते. परंतु, त्यांचा हा विजयरथ कोलकाताने रोखला.

गुजरातकडून शुभमन गिल आणि साई सुदर्शन यांनी डावाची सुरुवात केली. दुसऱ्या आणि तिसऱ्या षटकात मिळुन या दोघांनी २७ धावा केल्या. परंतु, तिसऱ्या षटकाच्या शेवटचा चेंडू सुदर्शनच्या हाताच्या कोपऱ्याला लागल्यामुळे रियायर्ड हर्ट होऊन त्याला बाहेर जावे लागले. निशांत सिंधू देखील १ धावेवरच बाद झाला. त्यानंतर मात्र जॉस बटलरने शुभमन गीलची भक्कम साथ देत दोघांनी तब्बल १२८ धावांची भागीदारी केली. त्यात दोघांनी अर्धशतके ठोकली. त्यानंतर गील ८५ धावा करून बाद झाला. त्यामुळे सुदर्शन पुन्हा मैदानात आला. त्यानंतर बटलर (५७) १९व्या षटकात बाद झाला. तरी पराभवाचा फरक कमी करताना शेवटच्या षटकात सुदर्शन प्रयत्न करत होता. त्यावेळी त्याने अर्धशतकही झळकावले. तो ५३ धावांवर नाबाद राहिला, तर राहुल तेवतिया शेवटच्या चेंडूवर २ धावांवर बाद झाला. यावेळी कोलकाताकडून सुनील नरेनने २ बळी घेतले. तर, सौरभ दुबे आणि कॅमेरॉन ग्रीन यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

तत्पुर्वी, कोलकाताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकात २ बाद २४७ धावा केल्या. कोलकाताकडून फिन ॲलेनने ३५ चेंडूत ९३ धावांची खेळी केली. अंगक्रिश रघुवंशीने ४४ चेंडूत नाबाद ८२ धावा केल्या, तर कॅमेरॉन ग्रीनने २८ चेंडूत नाबाद ५२ धावा केल्या. गुजरातकडून मोहम्मद सिराज आणि आर साई किशोर यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

### कोलकाताने जिवंत ठेवले आव्हान

जर या सामन्यात गुजरातने विजय मिळवला असता, तर त्यांनी प्लेऑफमध्ये स्थान निश्चित केले असते. मात्र, कोलकाताने या सामन्यात विजय मिळवत प्लेऑफसाठीचे आव्हान जिवंत ठेवले आहे. आता गुजरातचा साखळी फेरीतील एकच सामना बाकी आहे, तर कोलकाताचे दोन सामने बाकी आहेत. कोलकाताचे ११ गुण असून ते ७ व्या क्रमांकावर आहेत. गुजरातचे १६ गुण असून ते दुसऱ्या क्रमांकावर कायम आहेत. मात्र, आता प्लेऑफच्या शर्यतीत राहण्यासाठी दोन्ही संघांना उर्वरित साखळी सामन्यांमध्ये विजय मिळवावाच लागणार आहे. सध्या ८ संघ अजूनही प्लेऑफच्या शर्यतीत आहेत.

# महाराष्ट्रातील मल्लांकडून कुस्तीप्रेमींना आशा




| सातारा | प्रतिनिधी |

हिंद केसरी कुस्ती स्पर्धा सातारा येथे आयोजित करण्यात आली आहे. भारतीय शैली कुस्ती महासंघ व महाराष्ट्र राज्य भारतीय शैली कुस्ती संघाच्या मान्यतेने राजेश्वर प्रतिष्ठान व तालीम संघाच्यावतीने हिंद केसरी कुस्ती स्पर्धा होत आहे. शुक्रवारी (दि.१५) या स्पर्धेचे उद्घाटन झाले.

ही स्पर्धा १९५८ मध्ये हैदराबादमध्ये सुरू झाली. त्यावेळी मध्य प्रदेशातील रामचंद्र बाबू यांनी पहिला हिंद केसरी होण्याचा मान मिळवला होता. महाराष्ट्राला पहिला हिंद केसरी मिळवून देण्याचा मान १९५९ मध्ये श्रीपती खंचनाळे यांनी मिळवला होता. त्यानंतर ही परंपरा गणपत आंधळकर, मारुती माने, हजरत पटेल, दीनानाथ सिंग व चंबा मुतनाळ यांच्यामुळे ती पुढे सुरू होती. त्यानंतर महाराष्ट्राला हा किताब मिळवण्यासाठी तब्बल २८ वर्षे वाट पाहावी लागली. २००३ मध्ये विनोद चौगुले यांनी ही कोंडी फोडली. पाठोपाठ योगेश दोडके (२००५), पुण्याच्या अभिजित कटके (२०२३) यांनी हा मान मिळवून महाराष्ट्राची मान उंचावली आहे. महाराष्ट्रात कोल्हापूर, पुणे, सोलापूर जिल्ह्याचे वर्चस्व राहिले आहे. याच जिल्ह्यातील मल्लांनी महाराष्ट्राला हा मान मिळवून दिला आहे. अलीकडच्या काळात हरियानाच्या मल्लांच्या वर्चस्वाला छेद देत महाराष्ट्राचे पैलवान पुन्हा एकदा हिंद केसरीच्या गदेवर नाव कोरण्यास सज्ज झाले आहेत. ट्रीपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी, शिवराज राक्षे, हर्षवर्धन सदगीर, वेताळ शेळके, पृथ्वीराज मोहोळ, महेंद्र गायकवाड, शुभम शिदनाळे, जयदीप पाटील हे मल्ल उतरले आहेत. सर्वांचे लक्ष लागले आहे ते विजय चौधरी यांच्या कामगिरीवर आहे. या मल्लांकडून महाराष्ट्रातील कुस्तीप्रेमींना मोठ्या आशा आहेत.

# ५९ सामन्यांपर्यंत १३ शतके



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

आयपीएलची सुरूवात २००८ पासून झाली. तेव्हापासून आत्तापर्यंत गेल्या १९ वर्षांत १२० हून अधिक शतके झाली आहेत. आयपीएलच्या पहिल्याच सामन्यात ब्रेंडन मॅक्युलमने १५८ धावांची खेळी करत इतिहास घडवला होता. मात्र, असे असले तरी २०२६ आयपीएलचा हंगाम वेगळा ठरला आहे.

आयपीएल २०२६ स्पर्धेत ५९ सामन्यांपर्यंत १३ शतके ठोकण्यात आली आहेत. विशेष म्हणजे या स्पर्धेत खेळलेल्या प्रत्येक १० संघाकडून शतके झाली आहेत. मुंबई इंडियन्सकडून सर्वाधिक ३ खेळाडूंनी शतके केली, तर चेन्नई सुपर किंग्सकडून संजू सॅमसनने २ शतके केली आहेत. बाकी ८ संघांकडून प्रत्येकी १ शतक झाले आहे. त्यामुळे एकाच हंगामात सर्व १० संघांकडून शतके होण्याची यंदा ही पहिलीच वेळ आहे. याआधी झालेल्या १८ हंगामात कधीही सर्व सहभागी संघांकडून शतके झाली नव्हती. आयपीएल २०२६ स्पर्धेतील पहिल्या शतकाचा मान संजू सॅमसनने मिळवला, तर वैभव सूर्यवंशीने ३६ चेंडूत शतक केले होते. त्यामुळे त्यांचे आयपीएल २०२६ स्पर्धेतील हे सर्वात जलद शतक होते, तर केएल राहुलने सर्वोच्च नाबाद १५२ धावांची खेळी केली होती.

### आयपीएलमधील शतकवीर

- सीएसके : संजू सॅमसन (२ शतके)
- एमआयः क्विंटन डी कॉक, रायन रिकल्टन आणि तिलक वर्मा (प्रत्येकी १ शतक)
- केकेआरः फिन ॲलेन (१ शतक)
- आरआरः वैभव सूर्यवंशी (१ शतक)
- पीकेः कुपर कोनोली (१ शतक)
- आरसीबीः विराट कोहली (१ शतक)
- एसआरएचः अभिषेक शर्मा (१ शतक)
- डीसीः केएल राहुल (१ शतक)
- एलएसजीः मिचेल मार्श (१ शतक)
- जीटीः साई सुदर्शन (१ शतक).

## पाकिस्तानला मोठा धक्का

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

पाकिस्तान संघाला बांगलादेशकडून कसोटीत पराभव पत्करावा लागला. त्यामुळे पाकिस्तानला जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतही मोठा धक्का बसला. त्यात आयसीसीने त्यांच्यावर मोठी कारवाई केली आहे. या पराभवानंतर पाकिस्तान (५०.००) शर्यतीत होता; परंतु, आयसीसीच्या कारवाईने त्यांचे स्थान खालावले आहे. बांगलादेशविरुद्धच्या कसोटी सामन्यात लक्ष्यापेक्षा आठ षटके कमी पडल्यामुळे पाकिस्तानचे आयसीसीमधील आठ गुण कमी करण्यात आले आहेत.

# बदलापूरमध्ये व्हॉलीबॉलचा थरार

| बदलापूर | प्रतिनिधी |

क्रीडा व युवक सेवा संचालनालय कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत २१ वर्षांखालील मुलींच्या गटात मुंबईने सलग तिसरा विजय संपादन केला. शेवटच्या साखळी लढतीत मुंबईने लातूर विभागाचा २५-१४, २५-११ गुणांनी पराभव करीत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. उपांत्य फेरीत गटात अव्वल ठरलेल्या मुंबईची नागपूरशी लढत रंगणार आहे. दुसरी उपांत्य लढत नाशिक विरूद्ध पुणे विभागात होणार आहे. गतविजेत्या नाशिक संघानेही ३ सामने जिंकून विजेतेपदाचे दावेदार असल्याचे दाखवून दिले आहे. २१ वर्षांखालील मुलांच्या गटात गतविजेत्या लातूरने अपेक्षेप्रमाणे मुसंडी मारली. कोल्हापूर, संभाजीनगर पाठोपाठ अमरावतीला लोळवून लातूर गटात अव्वल ठरला. अटीतटीच्या तिसऱ्या साखळी सामन्यात लातूरने अमरावतीला २५-२०, २५-२१ गुणांनी पराभव करीत आव्हान संपुष्टात आणले. लातूरची उपांत्य फेरीत नागपूर विरूद्ध आमनासामना होणार आहे.

मुलांच्या १८ वर्षांखालील गटात नागपूरने मुंबईला तिसऱ्या सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत बाजी मारली. तिसऱ्या साखळी लढतीत पहिला सेट नागपूरने गमवला होता. दुसऱ्या सेटमध्ये तुफानी खेळ करीत विजय खेचून आणला. २४-२५, २५-२१, १५-१० गुणांनी नागपूरने मुंबईचे उपांत्य फेरीतील स्वप्न धुळीस मिळवले. उपांत्य फेरीत नागपूरची पुणे विरूद्ध झुंज होईल. मुलींच्या १८ वर्षांखालील गटात पुणे संघाने गटात अव्वल स्थान प्राप्त केले. तिसऱ्या साखळी लढतीत नागपूरचा २५-११, २५-७ गुणांनी धुव्वा उडवित उपांत्य फेरीत धडक मारली आहे. गतविजेत्या लातूर संघाने १८ वर्षांखालील मुलींच्या गटात पराभवानंतर तिसरा साखळी सामना जिंकत उपांत्य फेरीचा पल्ला पार केला. उपांत्य फेरीत पुणे विरूद्ध लातूर ही एक चुरशीची लढत रंगणार आहे.

## सात्त्विक, चिरागची दमदार कामगिरी



| बँकॉक | वृत्तसंस्था |

कडव्या आव्हानाचा सामना करत आणि जबरदस्त मानसिक ताकद दाखवत भारताच्या सात्त्विक आणि चिराग शेट्टी यांनी थायलंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेत अंतिम फेरीत धडक मारली. त्यांनी मलेशियाच्या गोह स्झे फेई आणि नूर इझुद्दीन या जोडीचा तीन गेममध्ये पराभव केला. जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर असलेल्या सात्विक आणि चिराग यांनी २०१९ आणि २०२४ मध्ये या स्पर्धेचे विजेतेपद पटकावले होते. यावेळी उपांत्य सामन्यात त्यांनी दडपणाखाली कमालीचा संयम दाखवून जागतिक क्रमवारीतील नवव्या स्थानावरील मलेशियन जोडीचा १९-२१, २२-२०, २१-१६ असा पराभव केला. हा उपांत्य सामना तब्बल ८२ मिनिटे चालला. या विजयानंतर खूप छान वाटत आहे. वर्षाची सुरुवात आमच्यासाठी चांगली झाली नव्हती. मानसिकदृष्ट्याही आम्ही फार सक्षम नव्हतो. कारण सुरुवात अपेक्षेप्रमाणे होत नव्हती, असे चिराग म्हणाला.

# कोलकाताचे १८ कोटी पाण्यात?

- पदार्पण करताना मशीथा पथिराना दुखापतग्रस्त
- खेळाडू आणि चाहत्यांमध्ये चिंतेचे वातावरण

| कोलकाता | वृत्तसंस्था |

यंदाच्या आयपीएल हंगामात अनेक खेळाडू दुखापतीमुळे बाहेर गेले आहेत. त्यामुळे त्यांना संपूर्ण स्पर्धेला मुकावे लागले आहे. त्यातच शनिवारी (दि.१६) झालेल्या गुजरात आणि कोलकाता यांच्या सामन्यात आयपीएलमध्ये पहिल्यांदाच पदार्पण करताना मथीशा पथिरानाला गोलंदाजी करताना मैदानाबाहेर जावे लागल्याने त्याच्या दुखापतीची भीती वाढली आहे. टी-२० विश्वचषकादरम्यान झालेल्या दुखापतीतून सावरल्यानंतर या हंगामातील पहिला सामना खेळणारा श्रीलंकेचा वेगवान गोलंदाज गोलंदाजीला सुरुवात केल्यानंतर फक्त ८व्या चेंडूलाच अस्वस्थ दिसला. पथिरानाने ७ चेंडू टाकल्यानंतर ८ वा चेंडू टाकण्याचा प्रयत्न करताना धावपट्टी सोडली. त्यानंतर त्याच्यावर मैदानातच तातडीने उपचार करण्यात आले, त्यामुळे कोलकाताचे खेळाडू आणि चाहते चिंतेत पडले. त्रास होत असतानाही पथिरानाने जिद्द दाखवत षटकाचा शेवटचा चेंडू टाकला. त्यानंतर त्याला उपचारासाठी मैदानाबाहेर घेऊन जाण्यात आले. यंदाच्या आयपीएल लिलावात कोलकाताने पथिरानाला आपल्या संघात घेण्यासाठी कोलकाताने १८ कोटी रुपये मोजले होते. कोलकाता आता प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी धडपडत असताना पथिरानाने संघात पुनरागमन केले होते आणि त्याचे संघात येणे कोलकातासाठी महत्त्वाचे मानले जात होते. मात्र, त्याच्या दुखापतीमुळे आता कोलकाताची चिंता वाढली आहे.

## आरसीबीने बदलला कर्णधार

| धर्मशाला | प्रतिनिधी |

आरसीबीला पंजाबविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यापूर्वी मोठा धक्का बसला आहे. धर्मशालामध्ये पार पडलेल्या ६१व्या सामन्याआधी अचानक संघाच्या कर्णधारपदात बदल करण्यात आला. नियमित कर्णधार रजत पाटीदार दुखापतीमुळे धर्मशालाला पोहोचलाच नाही आणि त्यामुळे या सामन्यात संघाची धुरा जितेश शर्माने सांभाळली. नाणेफेक वेळी जितेश शर्माने सांगितले की, रजत पाटीदार अजून दुखापतीतून सावरत असून पुढील हैदराबादमधील सामन्यात तो पुनरागमन करू शकतो.

परळमध्ये व्यावसायिक खो-खोचा जल्लोष | रेल्वे संघांची अंतिम फेरीत धडक

# लाल मैदानावर रंगणार महामुकाबला

| मुंबई | प्रतिनिधी |

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया स्पोर्ट्स क्लब तर्फे पहिली व्यावसायिक निमंत्रित खो-खो स्पर्धा परळच्या ऐतिहासिक लाल मैदानावर सुरू आहे. या स्पर्धेतील उपांत्य फेरीच्या सामन्यांनी प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले होते. चुरशीच्या लढती, दमदार संरक्षण, अचूक रणनीती आणि शेवटच्या क्षणापर्यंत रंगलेला थरारीमुळे मैदानातील वातावरण भारावून गेले होते. अखेर सेंट्रल रेल्वे आणि वेस्टर्न रेल्वे यांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.



### रेल्वे विरूद्ध रेल्वेत संघर्ष

या स्पर्धेच्या अंतिम फेरीत सेंट्रल रेल्वे आणि वेस्टर्न रेल्वे यांच्यात विजेतेपदासाठी जबरदस्त संघर्ष रंगणार असून, परळच्या लाल मैदानावर पुन्हा एकदा वेग, चपळाई आणि रणनीतीचा अद्भूत संगम पाहायला मिळणार आहे. खो-खो प्रेमींमध्ये अंतिम सामन्याबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली असून, 'आरबीआय व्यावसायिक खो-खो स्पर्धेचा किताब कोण पटकावणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पहिल्या उपांत्य फेरीत सेंट्रल रेल्वेने रचना नोटरी वर्क्सचा ११-१० (मध्यंतर १०-६) असा ७.५० मि. राखून थरारक पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली. सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत सेंट्रल रेल्वेने सामन्यावर मजबूत पकड निर्माण केली होती. विजयी संघाकडून शुभम थोरात, अवधूत पाटील, रामजी कश्यप, निखिल बी. आणि मिलिंद चावरेकर यांनी शानदार खेळ करत संघाचा विजय निश्चित केला. दुसऱ्या उपांत्य फेरीत वेस्टर्न रेल्वेने महाराष्ट्र पोस्टचा ८-९ (मध्यंतर ४-९) असा १ डाव राखून १ गुणाने धुव्वा उडवत अंतिम फेरीत शानदार प्रवेश केला. सामन्याच्या सुरुवातीपासूनच वेस्टर्न रेल्वेने अचूक डावपेच आणि मजबूत संरक्षणाच्या जोरावर सामन्यावर वर्चस्व राखले. विजयी संघाकडून राहुल मंडल, महेश शिंदे, अभय रत्नाकर, वृषभ वाघ, आदित्य गणपुले, निखिल सोडिये आणि विजय शिंदे यांनी अप्रतिम खेळाची झलक दाखवत संघाला विजय मिळवून दिला.

# पंतला १२ लाख रुपयांचा दंड



| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

इंडियन प्रीमियर लीगच्या ५९ व्या सामन्यात लखनऊ सुपर जायंट्सने चेन्नई सुपर किंग्सवर ७ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यानंतर लखनऊ संघाचा कर्णधार ऋषभ पंतवर दंड ठोठावण्यात आला आहे. आयपीएलने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, शुक्रवारी (दि.१५) झालेल्या चेन्नईविरुद्धच्या हंगामातील ५९ व्या सामन्यात संथ गतीने षटके टाकल्याबद्दल ही कारवाई करण्यात आली आहे. आयपीएलच्या आचारसंहितेतील कलम २.२२ नुसार किमान षटकगतीच्या नियमांचे उल्लंघन केल्यामुळे हा दंड ठोठावण्यात आला आहे. या हंगामातील हे लखनऊ संघाचे पहिले उल्लंघन असल्याने ऋषभ पंतवर १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. या हंगामात लखनऊ संघाची कामगिरी फारशी चांगली ठरली नाही. त्यांनी या हंगामात आतापर्यंत १२ सामने खेळले असून, त्यामध्ये ४ सामन्यांत विजय मिळवला आहे. तर, ८ सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यांच्या या खराब कामगिरीमुळे लखनऊ आयपीएलमधून बाहेर होणारा पहिला संघ ठरला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आॅर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)